मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | रविवार, १३ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ११३ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



## बाबा सिद्दीकी यांचा गोळीबारात मृत्यू

**मुंबई :** काँग्रेसचे माजी आणि राष्ट्रवादीचे (अजित पवार) आजी नेते बाबा सिद्दीकी यांच्यावर आज गोळीबार करण्यात आला आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. निर्मल नगर परिसरातील त्यांचा मुलगा आमदार झिशान सिद्दीकी यांच्या कार्यालयाबाहेर हा हल्ला झाल्याची माहिती आहे. हल्लेखोरांनी बाबा सिद्दीकी यांच्यावर दोन ते तीन राऊंड फायर केल्याचं सांगण्यात येत आहे. दरम्यान, या हल्ल्यात बाबा सिद्दीकी यांचा मृत्यू झाला आहे. हल्लेखोरांनी केलेल्या गोळीबारात बाबा सिद्दीकी यांच्या छातीला गोळी लागली. या हल्ल्यानंतर त्यांना तत्काळ लिलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपाचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

वृत्त पान 3 वर

## काही झालं तरी महाराष्ट्र भाजपच्या हाती जाऊ देणार नाही!

### उद्धव ठाकरेंचा भाजपवर हल्लाबोल

**प्रतिनिधी**
**मुंबई**

उद्धव ठाकरे आज आक्रमकपणे म्हणाले की, महाराष्ट्राची ओळख सांगणारी ही लढाई आहे. महाराष्ट्राचं जे वर्णन आहे, मंगल देशा पवित्र देशा राकट देशा फुलांच्या देशा... बुद्धीच्या देशा. हे वर्णन कायम ठेवायचं आहे. "लाचार आणि गद्दारांच्या देशा" असं करायचं नाही. मी काही झालं तरी हा महाराष्ट्र भाजपच्या हाती जाऊ देणार नाही. फुले, आंबेडकर, शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र मोदी-शाह यांच्या हाती जाऊ देणार नाही, असं म्हणत ठाकरेंनी आज भाजप व शिंदेंवर जोरदार हल्लाबोल केला.

अजित पवार महायुतीत राहणार नाहीत, या आशयाचं विधानही उद्धव ठाकरेंनी यावेळी केलं. ठाकरे म्हणाले, आता असं कळलंय की 70 हजार कोटींचा घोटाळा करणारेही लाजून बाहेर पडणार आहेत. त्यांना पण लाज वाटू लागली आहे, असं ऐकलंय. यांचा घोटाळा मोठा आहे. माझा तर काहीच नाही असं त्यांना वाटतंय, असं मी ऐकलंय.

आपल्यासमोर असलेली ही लढाई म्हणजे महाभारत आहे, पांडव पाच होते आणि कौरव शंभर. सुईच्या अग्रवार मावेल इतकीही जागा तुम्हाला देणार नाही, अशी मस्ती कौरवांची होती. भाजपाचीही आज हीच भूमिका आहे.ज्यांनी तुम्हाला संकट काळात साथ दिली, महाराष्ट्रात यांना (भाजपा) कुणी विचारत नव्हतं तेव्हा आम्ही भाजपाला खांद्यावर घेतलं. आज आम्हाला भाजपाला खांदा द्यायचा आहे, असाही टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.

### *चंद्रचूडसाहेब अजूनही वेळ गेलेली नाही, तारखांवर तारखा देऊ नका! ठाकरेंचा 'सर्वोच्च' टोला*

*जर तुम्हाला इतिहासामध्ये तुमचं नाव अभिमानाने घ्यावं, असं वाटत असेल तर आज ती वेळ आहे. लोकशाही वाचवा, लोकशाही वाचवा, अशी नुसती भाषणं देऊन उपयोग नाही, निर्णय घ्या. चंद्रचूडसाहेब अजूनही वेळ गेलेली नाही, अशा शब्दांत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात लांबलेल्या शिवसेना केसवर सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांना टोला लगावला. ठाकरे म्हणाले की, चंद्रचूड बोलले की, निवृत्तीनंतर इतिहासात माझी दखल काय म्हणून घेतली जाईल मला माहीत नाही, पण चंद्रचूडसाहेब अजूनही वेळ गेलेली नसल्याचे सांगत जे बाहेर बोलत आहात ते आत बोला आणि न्याय द्या, असा टोलाही लगावला. तीन सरन्यायाधीश शिवसेना प्रकरणात न्याय करू शकले नसल्याचे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.*



## हिंदूंनी संघटीत राहणे गरजेचे!

### संघ मुख्यालयात भागवतांच्या हस्ते शस्त्रपूजा

**प्रतिनिधी**
**नागपूर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रमुख मोहन भागवत यांनी विजयादशमीनिमित्त नागपूरातील रेशम बाग मैदानावर शस्त्रपूजानंतर आयोजित विजयादशमी उत्सवाला संबोधित केले. आपल्या भाषणात त्यांनी बांगलादेशातील हिंदूवर होणाऱ्या अत्याचारांसह अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली.


राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत म्हणाले की, बांगलादेशात नुकत्याच झालेल्या दंगलीच्या काळात हिंदूंवर अत्याचार झाला होता. मात्र त्यानंतर बांगलादेशी हिंदू रस्त्यावर उतरले असून त्यांनी मोठे धाडस केले आहे. ते म्हणाले की, जोपर्यंत कट्टरतावादी प्रवृत्ती असेल तोपर्यंत केवळ हिंदूच नाही तर इतर अल्पसंख्याकांनाही याचा धोका राहिल. त्यांना भारतातील आणि जगभरातील हिंदूंच्या मदतीची गरज आहे.

हिंदू समाजाने एकसंध राहून दुर्बल होऊ नये यावर त्यांनी भर दिला. भागवत म्हणाले की, "आपल्याला हिंसक व्हायची गरज नाही, परंतु संघटीत राहणे महत्त्वाचे आहे. जेणेकरून आपण अत्याचारांना तोंड देऊ शकू", केंद्र सरकारने बांगलादेशातील हिंदूंना मदत करावी, कारण तेथील कट्टरतावादी मानसिकतेमुळे अल्पसंख्याकांवर हल्ले होत असून अल्पसंख्यांकांवर धोका होत आहे.

### *'हिंदू' हा वास्तवात मानवधर्म, विश्वधर्म आहे!*

*"आपला इतिहास बघा. तुम्हाला कळेल की भारतात जे कर्तृत्व घडलंय, जो संघर्ष झालाय तो धर्मासाठी झालाय. त्या धर्माचं स्पष्ट स्वरूप आपल्याला लक्षात यायला हवं. आपण कोण आहोत? आपण म्हणत असतो की, आपण सगळे हिंदू आहोत. पण जो शाश्वत आहे, जो सनातन आहे, जो सृष्टीसोबतच अस्तित्वात आलाय, जो सगळ्यांना आहे, जो सगळ्यांचा आहे, आपण त्याचा शोध लावलेला नाही. आपण कुणाला तो दिलेला नाही. आपण त्याला फक्त ओळखलं आहे. त्यामुळेच त्याला हिंदू धर्म म्हणतात. जो वास्तवात मानवधर्म, विश्वधर्म आहे. तो आपला स्वत्व आहे. त्याच्या आधारावर चालणं, छोटे-छोटे व्यवहारदेखील त्याच्या आधारावर होतात. त्याच्या गौरवातून स्वाभिमान उत्पन्न होतो. स्वाभिमान आपल्याला पुढे जाण्याचं सामर्थ्य देतो", असंही त्यांनी नमूद केलं.*

## यंदा उलथापालथ करावीच लागेल !



### मनोज जरांगेंचा महायुतीला इशारा

### आचारसंहिता लागू झाल्यानंतर मुख्य भूमिका जाहीर करणार

*सविस्तर वृत्त पान 8 वर*

## मी अडीच वर्षाचं रिपोर्ट कार्ड सर्वांसमोर ठेवायला तयार, हिंमत असेल तर तुम्हीसुद्धा ठेवा!

### मुख्यमंत्र्यांचे ठाकरेंना आव्हान



**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दसरा मेळाव्यातील भाषणातून उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेवर जोरदार टीका केली. मी आमच्या अडीच वर्षाचं रिपोर्ट कार्ड सर्वांसमोर ते ठेवायला तयार आहे तुम्ही सुद्धा तुम्ही दोन वर्षात काय केले ते हिंमत असेल तर लोकांपुढे ठेवा, असे आव्हान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

'जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो' ही गर्जना करून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जेव्हा भाषणाची सुरुवात करायचे तेव्हा सर्वांच्या अंगावर काटा उभा राहायचा. 'गर्व से कहो हम हिन्दू हैं', ही सिंहगर्जना बाळासाहेबांनी सर्वांना दिली. काही जणांना आता "हिंदू" म्हणून घेण्याची लाज वाटू राहिली आहे. हिंदुहृदयसम्राट म्हणायला काही जणांची जीभ कचरू लागली आहे. पण आपल्याला हा शब्द उच्चारायला लाज नाही तर अभिमान आणि स्वाभिमान वाटतो, असे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. बाळासाहेबांच्या विचारांशी बेईमानी करणाऱ्यांपासून शिवसेना आपण मुक्त केली. म्हणून आझाद शिवसेनेचा हा "आझाद मेळावा" आहे. येथे शिवसैनिकांचा जनसागर आला आहे.

पान 5 वर

### *होती दाढी, म्हणून उद्धवस्त केली महाविकास आघाडी!*

*मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, दिसेल त्या कामाला ब्रेक लावण्याचे काम महाविकास आघाडीने केले. "जिथे नव्हते ब्रोकर, तिथे टाकले स्पीड ब्रेकर" हेच महाविकास आघाडीचे काम. पण आम्ही त्याच सरकारला उखडून टाकले. माझी दाढी त्यांना खुपते पण मी सांगतो 'होती दाढी, म्हणून उद्धवस्त केली महाविकास आघाडी'. बंड केलं नसतं तर फक्त फेसबूक लाईव्ह झालं असतं. कोविड काळात तुम्ही मढ्याच्या टाळूवरचे लोणी खाल्ले. पण तुमच्या तोंडाला लागलेले शेण लपणार नाही. लोक मरत होते आणि तुम्ही पैसे मोजत होतात कुठे फेडणार ही पापे? राज्याच्या निवडणुकीत हरियाणाची पुनरावृत्ती केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. केंद्रात आम्ही कोणताही प्रस्ताव पाठवला तर नामंजूर होत नाही. आम्ही दिल्लीत विकासासाठी जातो. मुख्यमंत्री करा, मुख्यमंत्री करा... असे सांगायला आम्ही नाही जात, असा टोलाही शिंदेंनी यावेळी लगावला.*

### *अडीच लाख धारावीकरांना घरं देणार, मुख्यमंत्र्यांनी धारावीकरांना दिला विश्वास*

*"आधीच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितलं जे पात्र त्यांना घरे द्या. मी म्हटलं जे राहतात त्या सर्वांना घरे द्या. एक घराची किंमत एक कोटी, दोन लाख घरांची किंमत दोन लाख कोटी आहे. धारावीकारांनी अफवांना बळी पडू नका. तुमचं हित काय, स्वप्न काय ते पाहा", असे आवाहन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी धारावीकरांना आज केले. मुंबई महानगरपालिकेत सत्ता असताना उबाठाने प्रचंड लूट केली, असा थेट आरोपही शिंदे यांनी यावेळी केला.*

## ए आर रेहमानने कमला हॅरिस यांच्यासाठी रेकॉर्ड केले गाणे

### 13 ऑक्टोबर रोजी यूट्यूबवर प्रदर्शित होणार

**चेन्नई ।** भारतीय संगीतकार ए आर रेहमान यांनी कमला हॅरिस यांच्या समर्थनार्थ 30 मिनिटांचा व्हिडिओ परफॉर्मन्स रेकॉर्ड केला आहे. हा व्हिडिओ एशियन अमेरिकन अँड पॅसिफिक आयलँडर्स (AAPI) विजय निधी संस्थेने रेकॉर्ड केला आहे. हा व्हिडिओ AAPI च्या यूट्युब चॅनलवर 13 ऑक्टोबर रोजी रात्री 8 वाजता (14 ऑक्टोबर IST पहाटे 5 वाजता) रिलीज केला जाईल. हॅरिस



यांना पाठिंबा देणारे रेहमान हे दक्षिण आशियातील पहिले आंतरराष्ट्रीय कलाकार आहेत. अमेरिकेत 5 नोव्हेंबरला राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुका होत आहेत.

## झाडावरची शस्त्रे आता उतरवा, ही क्रांतीची वेळ, वचपा घेण्याची वेळ

### दसऱ्याच्या निमित्ताने राज ठाकरे यांचा मतदारांशी संवाद

**प्रतिनिधी**
**मुंबई**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी दसऱ्याच्या मुहूर्तावर आगामी विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे. कोणीही बेसावध राहू नका, शमीच्या झाडावरील शस्त्रे आता उतरवा,



केले आहे. दसऱ्याच्या निमित्ताने राज ठाकरे यांनी पॉडकास्टच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधला.

दसऱ्याच्या दिवशी सोने लुटले जाते. मात्र आपण आपट्याची पाने वाटत राहतो आणि आपट्याची पानेच आपल्या हातात राहातात. या व्यतिरिक्त काहीही राहत नाही. आपण या लोकांकडे लक्ष देणार कधी? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केला. आजचा दसरा अत्यंत महत्त्वाचा आणि निवडणुकीच्या तोंडावर आला असल्याचे त्यांनी म्हटले आहे. दरवर्षी तुम्ही बेसावध राहाता आणि सर्व राजकीय पक्ष आपापले खेळ करत राहतात. या सर्वात महाराष्ट्राची प्रगती कुठे चालली? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

पान 5 वर

## भारतीय जनता पक्ष हा दहशतवाद्यांचा पक्ष!



**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी भारतीय जनता पक्षावर हल्ला चढवला. भाजप हा दहशतवाद्यांचा पक्ष आहे, असे म्हणत खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला. त्याचबरोबर मल्लिकार्जून खर्गे यांनी हरयाणा विधानसभा निवडणुकीच्या निकालावरही भाष्य केले.

मल्लिकार्जून खर्गे म्हणाले, "जे बुद्धीवादी आहेत, त्यांना अर्बन नक्षल म्हणत आहेत. काँग्रेसला म्हणत आहेत. ही त्यांची सवय आहे. त्यांचा स्वतःचा पक्ष दहशतवाद्यांचा पक्ष आहे. लिंचिंग करतात, मारतात. अनुसूचित जातीच्या लोकांच्या तोंडात लघवी करतात. आदिवासींना आणून त्यांच्यावर बलात्कार करतात. दहशतवादी पक्ष तर त्यांचा आहे", असा पलटवार खर्गेनी मोदींच्या टीकेला उत्तर देताना केला.

पुढे खर्गे म्हणाले, "जे लोक हे सगळं (अत्याचार) करतात, त्यांना हे लोक (भाजप) पाठिंबा देतात. वरून दुसऱ्यांना बोलतात. मोदींना तर अधिकारच नाही. त्यांची सरकारे जिथे-जिथे आहेत. तिथे मागास लोकांवर अत्याचार होतात. विशेषतः आदिवासींवर अत्याचार होतात. वरून ही गोष्टी तेच बोलतात की, बघा तुमच्यावर (आदिवासींवर) हल्ले होतायेत. सरकार आमचं आहे का? तुमचं सरकार आहे, तुम्ही नियंत्रित करू शकता. पण, मोदींची सवय आहे, असेच बोलतात", अशा शब्दातखर्गेनी मोदींकडून केलेल्या जाणाऱ्या अर्बन नक्षल टीकेला उत्तर दिले.

काँग्रेसला सलग तिसऱ्यांदा हरयाणातील सत्तेपासून दूर राहावं लागलं. सत्तेने हूलकावणी दिल्यानंतर या निकालाबद्दल बोलताना मल्लिकार्जून खर्गे म्हणाले, "हरयाणामध्ये जे काही झालं आहे, आम्ही त्यासंदर्भात बैठका घेत आहोत. अहवाल आल्यानंतर हे स्पष्ट होईल की, काय करण्याची गरज आहे आणि हे असं कसं घडलं? पूर्ण देश आणि इतकंच नाही, तर भाजपाही म्हणत होती की, काँग्रेस जिंकणार. तरीही अशी कोणती कारणं आहेत, ज्यामुळे काँग्रेस पराभूत झाली? विजयानंतर अनेक लोक श्रेय घेतात, पराभवानंतर अनेक लोक टीका करतात", असे भाष्य खर्गेनी केले.



**मुंबई :** अखिल भारतीय मराठा महासंघाचे दसरा पूजन दादर येथील कार्यालयात पार पडले. यावेळी महासंघाचे पदाधिकारी दिलीपदादा जगताप, श्रीरंग बर्गे, विरेंद्र पवार, सुवर्णा पवार, संभाजीराजे दहातोंडे तसेच ईतर मान्यवर मंडळी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



## थोडक्यात

### मुलुंडमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**मुंबई:** मुलुंडमध्ये उपासनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलतर्फे एका भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार (ता. १४) ते गुरुवार (ता. २४) यादरम्यान एलबीएसस्थित हॉस्ूटिपटलमध्ये हे शिबिर होणार आहे. या शिबिरामध्ये कॅल्शियम, डी ३, संधिवात, एक्सरे, ऑर्थोपेडीक सल्ला आदींचा समावेश असणार आहे. या शिबिरामध्ये सहभागी होण्यासाठी नावनोंदणी आवश्यक आहे. तरी सर्व नागरिकांनी या वैद्यकीय तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन हॉस्पिटल व्यवस्थापनातर्फे करण्यात आले आहे.

### मुरबाड तालुक्यात भातपीक कापणीला सुरुवात

**मुरबाड:** तालुक्यात हळव्या जातीची भातपिके तयार झाली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी भातपिकाच्या कापणीला सुरुवात केली आहे. यंदा भातपिकाचे उत्पादन चांगले आले आहे; मात्र गेल्या तीन-चार दिवसांत पाऊस व जोरदार वाऱ्यामुळे काही ठिकाणी भातशेतात आडवे पडले आहे. तयार पीक पाणी साचलेल्या शेतात पडल्याने नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे..भाताचे कोठार समजल्या जाणाऱ्या मुरबाड तालुक्यात १५ हजार ५०० हेक्टर क्षेत्रावर भातपिकाची लागवड करण्यात आली आहे. यावर्षी चांगला पाऊस पडल्याने भातपिकाला चांगल्या प्रकारे फुटवा आला आहे. त्यामुळे भातपीक जोमात आले आहे. काही अपवाद वगळता बऱ्याच ठिकाणी हे भातपीक उभे आहे. पिकावर पडणारा रोग व भातपीक शेतातील पाण्यात पडल्यामुळे होणारे नुकसान अत्यंत कमी प्रमाणात आहे. काही दिवसांत पाऊस कमी झाल्याने त्याचा भातपिकाला चांगला फायदा झाला आहे. शेतात कमी प्रमाणात पाणी साचलेले आहे. त्यामुळे पिकाच्या कापणीसाठी चांगले वातावरण निर्माण झाले आहे.

### रुग्णशय्येवरील उपचारांबाबत इच्छापत्रानुसार निर्णय

**मुंबई:** वृद्धापकाळी किंवा रुग्णशय्येवर असताना कोणते उपचार करावेत किंवा करू नयेत याबाबतची इच्छा नागरिकांना आता आधीच नोंदवून ठेवता येणार आहे. भविष्यकाळातील वैद्याकीय उपचार पद्धतीबाबत हे निवेदन करण्याची सोय आता मुंबई महापालिकेने करून दिली आहे. इच्छुक नागरिकांना आपल्या वैद्याकीय निर्देशाची प्रत महापालिकेच्या सक्षम अधिकाऱ्याकडे जतन करता येणार आहे. त्याकरिता पालिकेने प्रत्येक विभागात एक याप्रमाणे २४ वैद्याकीय अधिकाऱ्यांनी नियुक्ती केली आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

# शहरातील धूळ प्रदूषणावर मात्रा; वसई विरार महापालिकेची 'फॉग कॅनन' यंत्रणा लवकरच कार्यरत

प्रतिनिधी
■ वसई

वसई विरार शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी पालिकेकडून पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. यात हवेत उडणारे धुळीकण शोषून त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी पाच फॉग कॅनन यांत्रिक वाहने खरेदी केली आहेत. येत्या आठवडा भरातच ती वाहने धूळ नियंत्रणासाठी रस्त्यावर उतरवली जाणार आहेत.




वसई विरार शहराचे झपाट्याने नागरीकरण वाढू लागले आहे. रस्त्यावरील वाढती वाहतूक व विविध ठिकाणी सुरू असलेले बांधकामांचे प्रकल्प यामुळे शहरात प्रदूषण वाढू लागले आहे. या वाढत्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर पालिकेकडून आता प्रदूषण नियंत्रणाच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

राष्ट्रीय हवा शुद्धीकरण उपक्रमाच्या अंतर्गत पालिकेच्या कार्यक्षेत्रात प्रदूषण कमी करण्यासाठी एकापाठोपाठ एक अशा उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे.हवेत धुळीकणांचे प्रमाण वाढत असल्याने त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी आता पाच फॉग कॅनन वाहने खरेदी करण्यात आली आहे. यासाठी ३ कोटी २० लाख रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे.

या यंत्रणेच्या माध्यमातून हवेतील धुळीकण नियंत्रण केले जाणार असून पाण्याच्या अतिसुक्ष्म थेंबांची फवारणी करून हवेतील धुलीकण नियंत्रण केले जाणार आहे. यासाठी या यंत्रामध्ये १० हजार लीटर क्षमतेची पाण्याची टाकी आहे. त्यात पाणी साठवून सूक्ष्म आकाराच्या नोझल्समधून पाण्याची फवारणी वर्दळीचे रस्ते, सार्वजनिक ठिकाणे, अंतर्गत रस्ते अशा ठिकाणी करून हवेतील नियंत्रण केली जाणार आहे.तर दुसरीकडे वाढत्या धुळीने दुभाजक , दुभाजकांच्या मध्ये लावण्यात आलेली झाडे ही धुळीने भरून जातात. त्याची या फॉग कॅनन यंत्राच्या द्वारे स्वच्छता करता येणार आहे.अशा प्रकारच्या यंत्रणेमुळे शहरातील प्रदूषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास पालिकेने व्यक्त केला आहे.

***प्रदूषण नियंत्रणासाठी विविध उपक्रम***

*वसई विरार शहरातील प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी मागील दोन शासनाच्या राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमांतर्गत (नॅशनल क्लीन एअर प्रोग्राम) या उपक्रमातून विविध उपक्रम राबविले जात आहेत. यात वृक्ष लागवड करणे, घनदाट जंगलासाठी मियावाकी वने विकसित करणे, गॅस दहिन्या असलेल्या स्मशानभूमी, ६ ठिकाणी हवा शुद्धीकरण यंत्रणा, सहा ठिकाणी हवा हवा शुद्धीकरण यंत्रणा बसविण्यात आल्या आहेत. शहरातील रस्ते सफाईसाठी सात झाडू यांत्रिक वाहने खरेदी करून या यंत्राद्वारे मुख्य रस्ते, रस्त्याच्या कडा अशा ठिकाणी स्प्रिंकल द्वारे पाणी शिंपडून रस्त्याची स्वच्छता केली जात आहे. प्रदूषण कमी करण्यासाठी पालिकेच्या परिवहन विभागाकडून ई बस सेवा सुरू केली आहे. असे विविध उपक्रम राबविले जात आहेत.*

## महामार्गावरील सिमेंट कॉंक्रिटीकरणाचे सदोष काम

# तरुणाचा दुचाकी अपघातात मृत्यू

प्रतिनिधी
■ वसई

मुंबई अहमदाबाद महामार्गावर सुरू असलेल्या सिमेंट कॉक्रीटीकरणाच्या (व्हाईट टॉपिंग) कामाने वसईतील एका दुचाकीस्वार तरुणाचा बळी गेला. महामार्गावरील ससूननवघर येथे अर्धवट कामामुळे या तरुणाची दुचाकी घसरली आणि तो कंटनेरच्या चाकाखाली येऊन त्याचा मृत्यू झाला.

एल्टन फर्नांडीस (३०) हा तरुण नायगावच्या अमोल नगर येथील निलांबरी सोसायटीत रहात होता. तो अंधेरी येथील एका कंपनीत काम करत होता. गुरूवारी पहाटे तो रात्रपाळी वरून आपल्या दुचाकीने घरी येत होता. मुंबई अहमदाबाद महामार्गावरील ससूननवघर गावाच्या हद्दीतून तो जात होता. महामार्गावर सिमेंट कॉक्रीटीकरणाचे (व्हाईट टॉपिंग) काम सुरू असल्याने रस्ता वर खाली झाला आहे. त्यामुळे एल्टनची दुचाकी त्या फटीत अडकली आणि एल्टन घसरून पडला. नेमका त्यावेळी शेजारून जाणाऱ्या पांढऱ्या रंगाच्या कंटेनर खाली तो आला. कंटेनरचे चाक त्याच्या डोक्यावरून गेल्याने त्याचा मृत्यू झाला.

अपघातानंतर कंटेनर चालक घटनास्थळावरून पसार झाला. महामार्गावरील कामामुळे रस्ते असमांतर झाले असून सर्वत्र खडी पसरली आहे. त्यामुळे हा अपघात झाला आणि एल्टनचा मृत्यू झाला अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळाराम पालकर यांनी दिली. या प्रकरणी नायगाव पोलिसांनी अज्ञात कंटेनर चालकाविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६ (१), २८१, १२५ (अ), १२५ (ब) तसेच मोटार वाहतकू अधिनियमाच्याकलम १८४, १८७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

**डिसेंबरला होते लग्न...**

एल्टनच्या मृत्यूने नायगावच्या अमोल नगर परिसरात शोककळा पसरली आहे. मनमिळावू स्वभावाच्या एल्टनचे ५ डिसेंबर रोजी लग्न ठरले होते. तो त्याच्या तयारीत होता. आनंदाचे वातावरण असताना ही दु:खद घटना घडली असे त्याच्या मित्रांनी सांगितले. शुक्रवारी संध्याकाळी नायगावच्या पाली चर्चमध्ये त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## वसईत मद्यपी तरुणाचा प्रताप

# पोलिसांनी अडवताच पेटवली दुचाकी



प्रतिनिधी
■ वसई

मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी पकडल्यानंतर रागाच्या भरात त्याने आपले दुचाकी जाळून टाकली. वसई पश्चिमेच्या सनसिटी येथे गुरुवारी संध्याकाळी पाच वाजता ही घटना घडली. शिवकुमार नायर (३०) असे या तरुणाचे नाव असून त्याला चौकशीसाठी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गुरुवारी दुपारी तीनच्या सुमारास नाकाबंदी दरम्यान त्याला पोलिसांनी अडवले होते. त्याने मद्यपान केल्याचे आढळून आले.

त्यानंतर पोलिसांनी त्याची दुचाकी जप्त केली आणि कागदपत्र घेऊन त्याला दुसऱ्या दिवशी बोलावले होते. संध्याकाळी पाचच्या सुमारास तो आला आणि पोलिसांशी वाद घातला. यावेळी अचानक त्याने आपले दुचाकी पेटवून दिली अशी माहिती वसई वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ निरीक्षक महेश शेटये यांनी दिली.

# बहुमजली इमारतींना नवीन नळजोडणी नाही

**वसई ।** मिरा-भाईंदर शहराला आवश्यक तेवढे पाणी उपलब्ध होत नसल्याने यापुढे चारपेक्षा अधिक मजले असलेल्या इमारतींना नवीन नळजोडणी न देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महापालिका आयुक्त संजय काटकर यांनी घेतला आहे. सूर्या धरण योजनेतील पाणी मिळत नाही तोपर्यंत ही स्थगिती असणार आहे; मात्र यामुळे शहरात पुन्हा एकदा टँकर लॉबी सक्रिय होण्याची भीती व्यक्त होत आहे..शहराची लोकसंख्या बारा लाखांहून पुढे गेली आहे. गेल्या काही वर्षांपासून सातत्याने टोलेजंग इमारती असलेली संकुले उभी राहत आहेत. त्या तुलनेत पाणीपुरवठ्यात वाढ झालेली नाही. मिरा-भाईंदरला दररोज २३५ दशलक्ष लिटर पाण्याची आवश्यकता आहे; परंतु एमआयडीसीकडून दररोज ११७ दशलक्ष लिटर आणि स्टेम प्राधिकरणाकडून सुमारे ७५ दशलक्ष लिटर असे एकूण १९२ दशलक्ष लिटर पाणीच दररोज मिळते.

# रतन टाटांना मरणोत्तर भारतरत्न किताब देऊन त्यांचा सन्मान व्हावा

प्रतिनिधी
■ मुंबई

उद्योग विश्वातील भारताचे कोहिनूर;टाटा सुमूहाचे प्रमुख पद्मविभूषण रतन टाटा यांच्या निधनाने संपूर्ण देशाची ;औद्योगिक सामाजिक क्षेत्राची फार मोठी हानी झाली आहे. रतन टाटा हे एक व्यक्ती नसून देशवासीयांना प्रेरणा देणारा विचार होते.उद्योगक्षेत्रात

विश्वविजयी ठरलेले रतन टाटा हे साधी राहाणी आणि उच्च विचार जगलेले आदरणीय अवलिया व्यक्तिमत्व होते.करुणेचा मानवतेचा महासागर होते.गरिबांना गरजूंना मदत करणारे दानविर होते.रतन टाटा यांच्या निधनाने गोरगरिबांचा गरजवंतांचा कैवारी हरपला आहे अशा शब्दांत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना रामदास





आठवले यांनी दिवंगत रतन टाटा यांना भावपुर्ण श्रद्धांजली वाहिली आहे.

देशात औद्योगिक करणारे उद्योगविश्वातील कोहिनूर रतन टाटा यांना मरणोत्तर भारतरत्न किताब देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान करावा अशी आपली आणि कोट्यवधी जनतेची मागणी आहे. त्यासाठी महाराष्ट्र राज्य सरकार आणि केंद्र सरकार कडे दिवंगत रतन टाटा यांना भारतरत्न देण्याची मागणी करणार असल्याचे ना. रामदास आठवले म्हणाले.

पद्मविभूषण रतन टाटा यांनी उद्योगक्षेत्रात केलेली कामगिरी ही हिमालया सरखी उंच आहे. लाखो लोकांना रोजगार देणारे रतन टाटा हे कामगाराचा आदर करीत असत. कामगारांना आपल्या यशाचा मान देत असत.कामगार शक्ती ला ते महत्व देत असत.कामगारांमध्ये ते मिसळत असत. मनमिळावू उद्योजक आणि ते मोठ्या मनाचा माणूस होते .त्यांच्याशी माझे खूप चांगले संबंध होते अनेकदा आम्ही भेटलो होतो अनेक कार्यक्रमात आम्ही एकत्र आलो होतो त्यांचा स्वभाव अत्यंत चांगला होता.असे ना.रामदास आठवले म्हणाले.

जगात रतन टाटा यांनी आपल्या देशाचे नाव उद्योग क्षेत्रात उज्ज्वल केले आहे .उद्योग क्षेत्रात प्रचंड यशस्वी होऊन ही त्यांनी कधीही आपली गर्भश्रीमंती चा देखावा मांडला नाही.त्यांचे कर्तुत्व उंच आकाशाला भिडले असले तरी ते कायम जमिनीवर राहिले. सामान्य माणसांचा त्यांनी कायम मान राखत सर्वांशी समतेने वागले. आपल्या उत्पन्नाचा 65 टक्के वाटा त्यांनी गोरगरिबांच्या देशाच्या समाजाच्या हिता साठी सतत दान केला आयुष्यभर दान पारमिता जपणारे रतन टाटा हे खऱ्या अर्थाने दानशुर गरिबांचे कैवारी होते.मुंबईत परेल मधील टाटा हॉस्पिटल हे कर्क रुग्णांना वरदान ठरले आहे. देशभरातील गरीब रुग्णांना जीवदान देणारे अनमोल वैद्यकीय मदत देणारे रुग्णालय आहे.रतन टाटांनी उद्योग क्षेत्रा सोबत देशासाठी आणि समाजासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे.त्यांच्या सारखा करूणाशील महान उद्योजक पुन्हा होणार नाही त्यांना देशभरातील रिपब्लीकन पक्षाच्या वतीने कोट्यवधी आंबेडकरी रिपब्लिकन कार्यकर्त्यांकडून भावपूर्ण श्रध्दांजली अशी शोकभावना ना.रामदास आठवले यांनी दिवंगत रतन टाटा यांना वाहिली आहे .

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल भाजपतर्फे चांदिवलीत बाईक रॅली काढून आनंदोत्सव साजरा

प्रतिनिधी
■ मुंबई

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारचे राज्यभरातून आभार मानले जात आहे. चांदिवली विधानसभा अध्यक्ष, माजी नगरसेवक प्रकाश देवजी मोरे यांच्या नेतृत्वाखाली चांदिवली विधानसभेच्या वतीने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल बाईक रॅली काढून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.



यावेळी माजी नगरसेवक प्रकाश देवजी मोरे, जिल्हा उपाध्यक्ष शुभ्रांशू दीक्षित, अल्पसंख्याक विभाग मुंबई अध्यक्ष वसीम खान, विधानसभा निवडणूक प्रमुख हरिष भांदिर्गे, विधानसभा महामंत्री अमेय दोंदे, रेश्मा चौगुले, विधानसभा महिला मोर्चा अध्यक्षा मंदा राठोड, युवा मोर्चा विधानसभा अध्यक्ष अभिषेक सिंग, जिल्हा महामंत्री - उत्तर भारतीय मोर्चा साधना शर्मा, जिल्हा महामंत्री गुजराती सेल भावेश भानुशाली, वॉर्ड अध्यक्ष १५६ सुबेदार यादव, वॉर्ड अध्यक्ष १५७ महेश चौगुले, वॉर्ड अध्यक्ष १५८ प्रशांत मौर्या, वॉर्ड अध्यक्ष १५९ परशुराम शिंदे, वॉर्ड अध्यक्ष १६० नितीन कांबळे, वॉर्ड अध्यक्ष १६१ संजय यादव, वॉर्ड अध्यक्ष १६२ जितेंद्र गायकवाड, वॉर्ड अध्यक्ष १६३ स्वप्निल पावनकर, वॉर्ड अध्यक्ष १६४ राधेश्याम यादव आदिसह भाजपचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

## आनंद बाबा आश्रममध्ये नवरात्रौत्सवनिमित्त होम हवन भंडारा



**मुंबई,:-** साकीनाका लक्ष्मी नारायण मंदिर मार्ग येथील आनंद बाबा आश्रम मध्ये नवरात्रौत्सव निमित्त होम हवन आणि महाभंडारा आयोजित करण्यात आला होता. यावेळी सर्व भाविक भक्तांनी गुरू समाधीची मोठ्या भक्तिभावाने पूजा अर्चा केली. दरम्यान कमला पंडित यांच्या मंत्रोपचार मध्ये नवमीचा होम हवन आणि आरती चा कार्यक्रम संपन्न झाला. यात महिला शक्तीला मोठ्या संख्येने स्थान देण्यात आले होते. यावेळी आनंद बाबा आश्रमाचे भाविक भक्त आणि ट्रस्टी उमाकांत मिश्रा, जयप्रकाश व्यास, मनोहरलाल व्यास, गिरेंद्र सिंह, संजय गिरी, अजित मिश्रा, नितू मिश्रा, निर्मला पांडे, श्वेता पांडे, अतुल मिश्रा, प्रणय साने, आदीसह अनेक सदस्य उपस्थित होते. यावेळी शेकडो लोकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सद्गुरू आनंद बाबा यांनी सुरू केलेला नावरात्रौत्सव अविरतपणे आश्रम सेवकांच्या माध्यमातून

## आमदार पराग शाह यांच्या हस्ते घाटकोपर येथील संविधान चौक नामफलकाचे उद्घाटन




**मुंबई,:-** घाटकोपर पूर्व विधानसभेचे सेवाभावी आमदार पराग शाह यांच्या शुभहस्ते घाटकोपर पूर्व पंतनगर मधील डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती स्थळ,इमारत क्र १०४ येथे संविधान चौक नामफलकाचे उद्घाटन शुक्रवार दिनांक ११ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. या दरम्यान स्वर्गीय रतनजी टाटांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. या प्रसंगी भालचंद्र शिरसाट, श्रीमती अनिताताई अतितकर, धर्मेश गिरी, अविनाश जाधव, संजय भोसले, देवेन चितलीया, सचिन भोसले, प्रशांत शेट्टी, बहुजन वैचारिक प्रतिष्ठान अध्यक्ष सत्यम लोखंडे, शैलेश मोरे, अशोक गजभिये, हेमंत कटारे आदी मान्यवर व स्थानिक रहिवासी उपस्थित होते.

## एकी आणि विकासकामांच्या बळावर महायुतीच राज्यात सत्ता स्थापन करणार - भवानजी

प्रतिनिधी
■ मुंबई

भाजपाचे वरिष्ठ नेते व मुंबईचे माजी उपमहापौर बाबुभाई भवानजी एका प्रसिद्ध पत्रात मनाले कि महायुतीतील एकी आणि महायुती सरकारने मागच्या अडीच वर्षांत केलेल्या विकासकामांच्या बळावर आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीला निर्विवाद बहुमतापेक्षाही अधिक जागा मिळतील असा विश्वासही भवानजी यांनी व्यक्त केला.

भवानजी पुरे म्हणाले कि लोकसभा निवडणुकीच्या वेळी विरोधकांनी अपप्रचार,दिशाभूल, फेक नरेटिव्ह पसरवून जनतेची मते मिळवली होती. मात्र आता त्यांच्या फेक नरेटिव्ह ला थेट नरेटिव्हने प्रत्युत्तर दिले जाईल. राज्य,जिल्हा, विधानसभा क्षेत्र स्तरावर महायुती एकदिलाने काम करून विधानसभा निवडणुकीत विजय मिळवेल.

महायुती सरकारच्या विकासकामांना मतदारासमोर घेऊन जाऊ. सरकारच्या चांगल्या कामांची माहिती मतदारांना देऊन सत्ता मिळवण्याचे विरोधकांचे मनसुबे उधळून लावू असेही त्यांनी नमूद केले व हरियाणा आणि जम्मू काश्मीरमधील यशाबद्दल भाजपाच्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले आणि पंतप्रधान नरेंद्रभाई मोदीजी चा विकासलक्शी कार्यची मतदारानी पोच पावती दिली.

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 113**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ११३**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

**मुंबई ।** शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे)युवासेना पुरस्कृत शिवशाही प्रतिष्ठानच्या वतीने शिवडी क्रॉसरोड येथील कार्यालयात वंदनीय हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांचे अत्यंत विश्वासु शिलेदार शिवसेनेचे पहिले आमदार, खासदार, माजी महापौर प्रिं.वामनराव महाडिक यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून, अभिवादन करताना महाराष्ट्र विधिमंडळ गटनेते, आमदार अजय चौधरी,शिवशाही प्रतिष्ठानचे संस्थापक,अध्यक्ष व शिवसेना नायगांव-वडाळा विधानसभा क्षेत्राचे सहनिरीक्षक सुरेश गणपत काळे, सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त संजय जगताप, शिवसैनिक अस्लम खान, राजाराम जाधव, नरेंद्र (नाना) कदम आदी कार्यकर्त उपस्थित होते.



# विविध योजनांच्या माध्यमातून महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास हातभार - मुख्यमंत्री शिंदे

## कुर्ला विधानसभा क्षेत्रातील विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

राज्य शासनामार्फत समाजातील विविध घटकांच्या उन्नतीसाठी योजना राबविल्या जात आहेत. महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, लेक लाडकी योजना, मोफत उच्च शिक्षण अशा विविध योजना राबविल्या जात असून महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास हातभार लावणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



कुर्ला विधानसभा क्षेत्रातील विविध विकास कामांचे भूमिपूजन तसेच लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ऑनलाईन करण्यात आले. तत्पूर्वी बंटर भवन कुर्ला येथे शुक्रवारी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आमदार मंगेश कुडाळकर, माजी खासदार राहुल शेवाळे आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्र उद्योग तसेच परकीय गुंतवणुकीत क्रमांक एकचे राज्य आहे. राज्यात महिलांबरोबरच शेतकरी, युवा, ज्येष्ठ नागरिक आदींसाठी देखील विविध योजना राबविण्यात येत आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी पुरेशी तरतूद करण्यात आली असून ही योजना बंद होणार नाही, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

छेडा नगर उड्डाण पुलाचे लोकार्पण. पूर्व द्रुतगती महामार्गावरील बीकेसी कनेक्टर पासून ते यु टर्न करिता प्रस्तावित असलेल्या पुलाचे भूमिपूजन. चुनाभट्टी रेल्वे फाटक वरून प्रस्तावित असलेल्या पुलाचे भूमिपूजन. कुर्ला विधानसभा क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण. चुनाभट्टी प्रवेशद्वार व इतर कामाचे लोकार्पण. कामराज क्रीडांगणाच्या सुशोभीकरणाच्या कामाचे लोकार्पण.

टिळक नगर येथील हनुमान मंदिर उद्यान नूतनीकरण व सुशोभीकरण कामाचे लोकार्पण. नेहरूनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण मधील नाना नानी पार्क व बालोद्यान याचे नूतनीकरण व सुशोभीकरण कामाचा शुभारंभ. कुर्ला विधानसभेमधील रस्त्यांच्या सिमेंट कॉंक्रिटीकरण कामाचे शुभारंभ. नेहरूनगर टिळक नगर या म्हाडा वसाहती मधील दुसऱ्या टप्प्यातील मला निसारण महिन्यांच्या कामाचे शुभारंभ. कुर्ला पूर्व रेल्वे स्थानकाजवळ बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना याचे लोकार्पण.

# बाबा सिद्दीकी यांचा गोळीबारात मृत्यू



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

काँग्रेसचे माजी आणि राष्ट्रवादीचे (अजित पवार) आजी नेते बाबा सिद्दीकी यांच्यावर आज गोळीबार करण्यात आला आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. निर्मल नगर परिसरातील त्यांचा मुलगा आमदार झिशान सिद्दीकी यांच्या कार्यालयाबाहेर हा हल्ला झाल्याची माहिती आहे. हल्लेखोरांनी बाबा सिद्दीकी यांच्यावर दोन ते तीन राऊंड फायर केल्याचं सांगण्यात येत आहे. दरम्यान, या हल्ल्यात बाबा सिद्दीकी यांचा मृत्यू झाला आहे. हल्लेखोरांनी केलेल्या गोळीबारात बाबा सिद्दीकी यांच्या छातीला गोळी लागली. या हल्ल्यानंतर त्यांना तत्काळ लिलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपाचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

या हल्ल्यात त्यांच्या एका सहकाऱ्याच्या पायालाही गोळी लागली आहे. आज रात्री ९ वाजताच्या सुमारास हा हल्ला झाला आहे. बाबा सिद्दीकी हे १९९९, २००४ व २००९ मध्ये असे सलग तीन वेळा ते विधानसभेवर निवडून आले होते. त्यांना २००४ ते २००८ या कालावधीत काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारमध्ये राज्यमंत्री म्हणून काम करण्याची पक्षाने संधी दिली होती. अर्थसंकल्प असो, पुरवणी मागण्या असो, की विशेष चर्चा असा मुंबईचे प्रश्न विशेषतः झोपडपट्ट्यांचे, चाळींचे, नागरी सुविधांचे प्रश्न ते हिरिरीने मांडत असत. २०१४ च्या मोदी लाटेत त्यांचा पराभव झाला. २०१९ मध्ये त्यांनी निवडणूक लढविली नाही, परंतु आपल्या मुलाला झिश्यान सिद्दीकी याला मतदारसंघ बदलून वांद्रे पूर्वमधून निवडून आणले. काही दिवसांपूर्वीच त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात प्रवेश केला होता.

# पालिकेच्या 26 व्या 'के उत्तर विभाग' कार्यालयाचे जोगेश्वरी पूर्व येथे मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

प्रशासकीय विभाग पुनर्रचनेतून नव्याने निर्मित के उत्तर प्रशासकीय विभागाद्वारे संपूर्ण क्षमतेने आणि सर्व प्रकारच्या नागरी सेवा सुविधा पुरविण्यात येणार आहेत. विभाग कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांना देण्यात येणाऱ्या सुविधेमध्ये यामुळे भर पडणार आहे. नागरिकांना आपल्या नजीकच्या परिसरात सेवा सुविधा प्राप्त करणे यामुळे शक्य होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत प्रशासकीय विभाग पुनर्रचनेनंतर नव्याने निर्माण झालेल्या १० मजली 'के उत्तर' या नव्या



प्रशासकीय विभाग कार्यालयाचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. त्यावेळी मुख्यमंत्री शिंदे हे बोलत होते.

के उत्तर इमारतीच्या कोनशिलेचे अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. जोगेश्वरी (पूर्व) मध्ये पूनम नगर परिसरातील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मजास मंडई स्थित या प्रशासकीय कार्यालय लोकार्पण सोहळयास खासदार रवींद्र वायकर, सहायक आयुक्त (के पूर्व) मनीष वळंजू यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, मुंबईतील रस्त्यांच्या कॉंक्रिटीकरणाचा प्रकल्प संपूर्ण महानगर क्षेत्रात राबविण्यात येत आहे. त्यामुळे खड्डेमुक्त रस्ते मुंबईतील नागरिकांना अनुभवायला मिळत आहेत. तसेच मुंबई सुशोभीकरण प्रकल्पातून नागरिकांना तसेच पर्यटकांना सर्वोत्तम अनुभव मिळाला आहे. मुंबई महानगर स्वच्छ असावे यासाठी सखोल स्वच्छता मोहीम देखील राबविण्यात येत आहे. एकूणच मुंबई महानगर स्वच्छ आणि सुंदर असावे यासाठी, महाराष्ट्र शासन आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत.

खासदार रवींद्र वायकर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, गत अनेक वर्षांपासून नागरिकांची आपल्या नजीकच्या परिसरात विभाग कार्यालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी होती. नव्या के उत्तर विभाग कार्यालयातून देण्यात येणाऱ्या सुविधेमुळे नागरिकांचे श्रम आणि वेळ यात बचत होणार आहे. नागरी सेवा सुविधा पुरवण्याचा वेग देखील वाढणार आहे. प्रशासकीय विभाग कार्यालयाच्या माध्यमातून पुरवण्यात येणाऱ्या १७ प्रकारच्या नागरी सेवा-सुविधा या कार्यालयाच्या माध्यमातून पुरविण्यात येणार आहेत.

के उत्तर प्रशासकीय विभागाच्या समावेशामुळे विभागांची संख्या २६ पर्यंत पोहचली आहे. या विभागांतर्गत एकूण लोसंख्या ४.२५ लाख असून आठ प्रभागांचा समावेश आहे. एकूण ८.५० चौरस किलोमीटर क्षेत्रफळाच्या क्षेत्रात हा विभाग विस्तारलेला आहे. अंदाजे चार लाखांहून अधिक लोकसंख्येचा समावेश या विभागामध्ये आहे. व शाम नगर तलाव, मेघवाडी, सर्वोदय नगर, शेर ए पंजाब वसाहत, जलाशय, जोगेश्वरी गुंफा, महाकाली गुंफा, जोगेश्वरी रेल्वे स्थानक पूर्व परिसराचा समावेश या प्रशासकीय विभागामध्ये आहे.

# जे.जे. हॉस्पिटलमधील क्ष-किरण शास्त्र विभागात दसरा सण उत्साहात साजरा

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

जे.जे. हॉस्पिटल मधील क्ष-किरण शास्त्र विभागात दसरा हा सण साजरा केला जातो. क्ष-किरण विभागातील विभाग प्रमुख डॉ. अविनाश गुटे सर व प्राध्यापक शरद माळवदकर सर, यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व डॉक्टर्स, सिस्टर, स्टाफ, क्ष-किरण तंत्रज्ञ , क्ष-किरण सहाय्यक,विदयार्थी, कक्षसेवक, व सफाईगार कर्मचारी हे सर्व मिळून सिटीस्कॅन मशीन, एमआरआय मशीन, सोनोग्राफी मशीन,व अन्य साहित्य यांची पूजाअर्चा करतात त्या नंतर डॉक्टर पासून ते सफाई कर्मचाऱ्यांपर्यंत आपट्याचे पान देऊन सर्व कर्मचारी एकमेकांना दसऱ्याच्या शुभेच्छा देतात.




दसरा या सणाची परंपरा फार पूर्वीपासूनची आहे. याच दिवशी देवीने महिषासुर या राक्षसाचा वध केला. प्रभू रामानेही याच दिवशी रावणाचा वध केला. पांडव अज्ञातवासात राहण्याकरिता ज्या वेळी गेले, त्या वेळी त्यांनी आपली शास्त्रे शमीच्या झाडावर ठेवली होती. अज्ञातवास संपल्यावर त्यांनी तेथील शस्त्रे परत घेतली व त्या झाडाची पूजा केली, तो हाच दिवस. दसरा म्हणजेच विजयादशमी . हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त आहे. अशी माहिती तृतीय श्रेणी संघटनेचे अध्यक्ष सुरेश तांबे यांनी दिली.

## मुंबईत पुढील तीन दिवस पावसाचे

**मुंबई:** मागील काही दिवस मुंबईसह राज्यभरात पावसाने विश्रांती घेतली होती. मात्र गेल्या दोन दिवसांपासून मुंबईसह राज्यातील बहुतांश भागात पाऊस पडत आहे. दरम्यान, मुंबई, ठाणे, तसेच पालघर जिल्ह्यात पुढील दोन – तीन दिवस पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. काही भागात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. अरबी समुद्रात महाराष्ट्राच्या किनाऱ्यालगत कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय आहे. ही प्रणाली वायव्येकडे जाताना आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. परिणामी, राज्यात पुढील दोन – तीन दिवस पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. किनारपट्टी भागात पावसाचा जोर राहील, तसेच घाटमाथ्यावरही पावसाची शक्यता आहे. मुंबईत मागील सलग दोन दिवस पाऊस कोसळत आहे. यामुळे वातावरणातील गारवा वाढला आहे. तसेच कमाल तापमानात घट झाली आहे. मागील काही दिवस तापमानात सातत्याने वाढ होत होती.

# विधिमंडळातील सहकारी आणि सर्वसामान्यांचा नेता गमावला

## बाबा सिद्दीकी यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांची श्रद्धांजली

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी राज्यमंत्री, विधिमंडळात प्रदीर्घकाळ राहिलेले माझे सहकारी बाबा सिद्दीकी यांच्यावर झालेल्या गोळीबाराची घटना अत्यंत दुर्दैवी निषेधार्ह आणि वेदनादायी आहे. या घटनेत त्यांचे निधन झाल्याचे समजून मला धक्का बसला. मी माझा चांगला सहकारी, मित्र गमावला आहे. या भ्याड हल्ल्याचा मी तीव्र शब्दात निषेध करतो, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माजी राज्यमंत्री बाबत सिद्दिकी यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करून श्रद्धांजली वाहिली.

या घटनेची सखोल चौकशी



करुन हल्लेखोरांवर कडक कारवाई करण्यात येईल. हल्ल्यामागच्या सूत्रधारही शोधण्यात येईल, असेही अजित पवार म्हणाले.

बाबा सिद्दीकी यांच्या निधनामुळे अल्पसंख्यांक बांधवांसाठी लढणारा, सर्वधर्मसमभावासाठी प्रयत्न करणारा एक चांगला नेता आपण गमावला आहे. त्यांचे निधन हे राष्ट्रवादी काँग्रेसचे मोठे नुकसान आहे. झीशान सिद्दीकी, सिद्दीकी कुटुंबिय आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या दुःखात मी सहभागी असल्याचेही असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

# रामलीला परंपरेला बाधा आणल्याचा आरोप

## महाराष्ट्र रामलीला समितीचे उपाध्यक्ष संदीप शुक्ला यांनी व्यक्त केली नाराजी

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

रावण दहनाला मुख्यमंत्री आले नाहीत, असे म्हणत महाराष्ट्र रामलीला समितीचे उपाध्यक्ष संदीप शुक्ला यांनी आज नाराजी व्यक्त केली.

वर्षानुवर्षे चालत आलेल्या रामलीला परंपरेला बाधा आणल्याचा गंभीर आरोप राज्य सरकारवर करण्यात आला आहे. ते म्हणाले की, नुकत्याच आलेल्या वृत्तपत्रांच्या वृत्तानंतर प्रशासनाची बदनामी झाली, त्यामुळे दक्षिण मुंबईतील काही नेत्यांनी घाईघाईने रामलीला मैदानावर रावण दहनाचे



आयोजन केले, असा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी निष्ठा असलेल्या काही नेत्यांनी केला. ते म्हणाले की रामलीला एक दिवस आधी संपली होती आणि काही मंडळांनी कवि संमेलन आयोजित केले होते. मात्र आता सरकारच्या दबावाखाली मंडळाने रावण दहनाचे आयोजन केले होते. रामाच्या राज्याभिषेकाची परंपराही खंडित झाली. जी परंपरा आणि धार्मिक श्रद्धांशी खेळत आहे, मुख्यमंत्र्यांनी 8.15 ची वेळ दिली आणि रॅली संपल्यानंतर मुख्यमंत्री रावण दहन करतील, असे सांगण्यात आले. रामभक्त वाट पाहत राहिले, मुख्यमंत्री आले नाहीत. मुंबई काँग्रेसचे कोषाध्यक्ष संदीप शुक्ला म्हणाले की, अशा राजकीय हस्तक्षेपामुळे धार्मिक कार्यक्रमांच्या पावित्र्याला धक्का बसत असून सरकारने रामभक्तांच्या भावनांशी खेळ केला आहे.

## तीन विद्यार्थिनींची छेड काढणाऱ्याविरोधात गुन्हा

**मुंबई:** वडाळा येथील शाळेजवळ तीन शालेय विद्यार्थिनींची छेड काढणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरोधात रफी अहमद किडवाई (आरएके) मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला. विनयभंग व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायद्याअंतर्गत (पोक्सो) आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून सीसी टीव्हीच्या मदतीने त्याचा शोध सुरू आहे. पीडित मुली १४ ते १५ वर्षे वयोगटातील आहेत. त्या शुक्रवारी शाळेत येत असताना तेथील बस थांब्याजवळ एका अज्ञात व्यक्तीने एका मुलीचा विनयभंग केला. तसेच इतर दोन मुलींनाही इशारा केला. मुलींनी शाळेत आल्यावर हा प्रकार शिक्षिकेला सांगितला. त्यानंतर शाळेच्या वतीने याप्रकरणी तक्रार देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आरएके मार्ग पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल केला. आरोपीचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

केनरा बैंक Canara Bank
भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

**काकड मार्केट शाखा :** पोस्ट बॉक्स नं.: २६१५,
काकड मार्केट, ३०६, काळबादेवी रोड, मुंबई ४०००02.

**ताबा सूचना [कलम १३(४)] स्थावर मालमत्तेसाठी**

ज्याअर्थी: निम्नस्वाक्षरीकार सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (कायदा) २००२ (५४/२००२) (ह्यानंतर नमूद कायदा असा संदर्भ असलेले) अंतर्गत कॅनरा बँक, काकड बाझार शाखेचे नियुक्त प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जदार, श्री. मंझूर मेहबूब खान आणि श्री. मेह्फुझ मेहबूब खान ह्यांना सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेली २०.०३.२०२४ अनुसार रक्कम रु. २४,०६,९३२.८६ (रुपये चोवीस लक्ष सहा हजार नऊशे बत्तीस आणि शहाऐंशी पैसे मात्र) त्यावरील व्याज आणि खर्चाचा भरणा नमूद सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी मागणी सूचना दिनांकित १७.०४.२०२४ जारी करण्यात आली होती.

कर्जदार/ हमीदार रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे सूचना ह्याद्वारे कर्जदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे देण्यात आहे की नमूद नियमावलीच्या नियम ८ आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३ (४) अंतर्गत त्याला / तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा निम्नस्वाक्षरीकारांनी १० ऑक्टोबर २०२४ रोजी सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनता ह्याना ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी असा व्यवहार जर झाला असल्यास कॅनरा बँक, काकड बाजार शाखा ह्यांच्याकडे २०.०३.२०२४ अनुसार रक्कम रु. २४,०६,९३२.८६ (रुपये चोवीस लक्ष सहा हजार नऊशे बत्तीस आणि शहाऐंशी पैसे मात्र) त्यावरील व्याज आणि खर्चाचा भरणा करण्यास बाध्य असतील. सुरक्षित मालमत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेया वेळेच्या संदर्भात नमूद कायद्याच्या कलम १३ (८) अंतर्गत असलेल्या तरतुदीकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

गाव कुरगाव, तालुका आणि जिल्हा पालघर येथे वसलेल्या रॉयल गार्डन म्हणून ज्ञात असलेल्या प्रकल्पामधील संमत आराखड्यानुसार इमारत क्र. २ आणि प्रवर्तकाद्वारे देण्यात आलेल्या क्रमांकानुसार इमारत क्र. ०६ मधील ए विंगच्या २ ऱ्या मजल्यावरील ४७९.३२ चौ. फू. म्हणजेच ४४.५३ चौ. मी. चटईक्षेत्र असलेल्या निवासी सदनिकेचा धारण केलेला सदनिका क्र. २०३.

उप निबंधक, पालघर च्या हद्दीमधील महसुली गाव कुरगाव, तालुका आणि जिल्हा पालघर चा धारण केलेला जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. ४३/२, ४३/३ वर बांधण्यात आलेली इमारत. शीर्षक धारक: श्री. मंजूर मेहबूब खान आणि श्री. मेह्फुज मेहबूब खान.

सीमा पुढीलप्रमाणे: उत्तर: रॉयल गार्डन मधील इमारत क्र. ५, दक्षिण : गाव वाडी, पूर्व: सुनिकेत पाटील ह्यांचा बंगला पश्चिम : गणेश वाडी.

**दिनांक: १०.१०.२०२४**
**ठिकाण: काकड मार्केट, मुंबई**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**कॅनरा बँक**

केनरा बैंक Canara Bank
भारत सरकार का उपक्रम A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

**काकड मार्केट शाखा : पोस्ट बॉक्स नं.: २६१५,**
**काकड मार्केट, ३०६, काळबादेवी रोड, मुंबई ४०००02**

**ताबा सूचना [कलम १३(४)] स्थावर मालमत्तेसाठी**

ज्याअर्थी: निम्नस्वाक्षरीकार सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (कायदा) २००२ (५४/२००२) (ह्यानंतर नमूद कायदा असा संदर्भ असलेले) अंतर्गत कॅनरा बँक, काकड बाझार शाखेचे नियुक्त प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जदार, श्री. मंझूर मेहबूब खान आणि श्री. मेह्फुझ मेहबूब खान, श्री. मंझूर मेहबूब खान आणि श्री. मेह्फुझ मेहबूब खान आर/ओ सदनिका क्र. २०२ आणि २०३, २ रा मजला, "ए" विंग, रॉयल गार्डन, गाव: कुरगाव, तालुका आणि जिल्हा पालघर ४०१४०४ आणि येथे देखील आर/ ओ श्री. मंझूर मेहबूब खान आर/ ओ, सीओ मेहबूब शरबत खान, रिजविया मस्जिद जवळ, खोली क्र. बी/ २८, पद्मा नगर, रोड क्र. १४, मस्जिद समोर ठाणे, महाराष्ट्र ४०० ०४३ आणि श्री. मेह्फुज मेहबूब खान, आर/ ओ ए २६ पद्मा नगर झोपडपट्टी, बैंगनवाडी गोवंडी, ठाणे महाराष्ट्र ४०० ०४३ ह्यांना सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेली २०.०३.२०२४ अनुसार रक्कम रु. १६,७७,९२९.८६ (रुपये सोळा लक्ष सत्याहत्तर हजार नऊशे एकोणतीस आणि शहाऐंशी पैसे मात्र) त्यावरील व्याज आणि खर्चाचा भरणा नमूद सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी मागणी सूचना दिनांकित १७.०४.२०२४ जारी करण्यात आली होती.

कर्जदार/ हमीदार रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे सूचना ह्याद्वारे कर्जदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे देण्यात आहे की नमूद नियमावलीच्या नियम ८ आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३ (४) अंतर्गत त्याला / तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा निम्नस्वाक्षरीकारांनी १० ऑक्टोबर २०२४ रोजी सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनता ह्याना ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी असा व्यवहार जर झाला असल्यास कॅनरा बँक, काकड बाजार शाखा ह्यांच्याकडे २०.०३.२०२४ अनुसार रक्कम रु. २४,०६,९३२.८६ (रुपये चोवीस लक्ष सहा हजार नऊशे बत्तीस आणि शहाऐंशी पैसे मात्र) चा भरणा करण्यास बाध्य असतील. सुरक्षित मालमत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेया वेळेच्या संदर्भात नमूद कायद्याच्या कलम १३ (८) अंतर्गत असलेल्या तरतुदीकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

गाव कुरगाव, तालुका आणि जिल्हा पालघर येथे वसलेल्या रॉयल गार्डन म्हणून ज्ञात असलेल्या प्रकल्पामधील संमत आराखड्यानुसार इमारत क्र. २ आणि प्रवर्तकाद्वारे देण्यात आलेल्या क्रमांकानुसार इमारत क्र. ०६ मधील ए विंगच्या २ ऱ्या मजल्यावरील ३४४.८८ चौ. फू. म्हणजेच ३२.०४ चौ. मी. चटईक्षेत्र असलेल्या निवासी सदनिकेचा धारण केलेला सदनिका क्र. २०३. उप निबंधक, पालघर च्या हद्दीमधील महसुली गाव कुरगाव, तालुका आणि जिल्हा पालघर चा धारण केलेला जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. ४३/२, ४३/३ वर बांधण्यात आलेली इमारत. शीर्षक धारक: श्री. मंजूर मेहबूब खान आणि श्री. मेह्फुज मेहबूब खान.

सीमा पुढीलप्रमाणे: उत्तर: रॉयल गार्डन मधील इमारत क्र. ५, दक्षिण : गाव वाडी, पूर्व: सुनिकेत पाटील ह्यांचा बंगला पश्चिम : गणेश वाडी.

**दिनांक: १०.१०.२०२४**
**ठिकाण: काकड मार्केट, मुंबई**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**कॅनरा बँक**

तुम्ही जिंकल्यावर कोण टाळ्या वाजवत नाहीत यावर बारकाईने लक्ष द्या. तुम्हाला लवकरच तुमचे खरे मित्र दिसायला सुरवात होईल.



- रॉबर्ट डाउनी ज्यु.
हॉलीवूड अभिनेता

वृत्तमानस
मुंबई, रविवार, १३ ऑक्टोबर २०२४

**१४-१०-२०२४ ते २०-१०-२०२४ (रविवार ते शनिवार)**




**मेष - संयम वाढवावा लाागेल.**
ग्रहप्रभाव पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना संयम बाळगणे बरे राहील.एखाद्या गोष्टीसाठी अडुन रहाण्यापेक्षा पर्यायी मार्ग शोधावा लागेल.या सर्व दिवसांत काहिही बोलतांना विचार करूनच बोलावे लागेल. कारण नसताना एखादी गोष्ट अंगलट येऊ शकते हे कदापी विसरु नये.इतरांच्या काही गोष्टी नाही पटल्या तरी त्या पटवून घ्याव्या लागतील.प्रतिक्रिया देत बसू नका.उगाचच अडून बसू नका.१७चा तूळेतला रविबदल पोषक असेल.२०चा कर्केतला मंगळबदल बरा राहील. व्यवसायात खरेदी विक्रीचे व्यवहार करताना भावनिक गोष्टी टाळा.नोकरदार वरिष्ठांच्या मर्जीने काम करावे.
**महिला-**वेळिच आर्थिक बचत करणे योग्य राहु शकल. उगाच कुटुंबात राग करू नका.जोडीदाराचा आदर करावा. आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहा. मानसिक शांतता जपावी.
**विद्यार्थी-**आरोग्याची काळजी घ्यावी.
**शुभदिनांक-१८-१०-२०.**

**वृषभ - समतोल राखणे बरे राहील.**
ग्रप्रभाव पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध पोषक राहु शकेल.नियोजित कामे करतांना लाभाचे प्रमान वाढते राहु शकेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना बोलतांना संयम ठेवावाच लागेल.महत्वाचे निर्णय घेतांना सर्व दिवस जपून पाऊल टाकावे लागेल.एक गोष्ट लक्षात ठेवावी.बळाने कोणती गोष्ट करायला गेलात तर त्रास वाढु शकतो.त्यापेक्षा थोडा धीर धरलेला बरा राहील.कोणी काय करावे वा काय करू नये याचा सल्ला देत बसू नका.व्यवहारात भावनिकता टाळा. रविबदल वाद टाळण्यास सांगतो.मंगळबदल पोषक असेल.व्यावसायिकदृष्ट्या जरा पण यशस्वी धावपळ होऊ शकेल.नोकरदार वर्ग कामकाजात बदल होऊ शकतील.
**महिला-**वायफळ खर्च कमी करावे लागतील.मुलांसाठी वेळ द्यावा लागेल. कौटुंबिक मतभेद दूर ठेवावे लागतील. जोडीदाराच्या साह्याने निर्णय घ्यावे. विचारपूर्वक वागावे.
**विद्यार्थी-**योग साधनेला महत्त्व द्या.
**शुभदिनांक-१४-१५-१६.**

**मिथुन-पोषक आठवडा जाईल.**
ग्रहप्रभाव पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना उत्तम यश मिळवु शकाल.गरज नसतांना उगाचच स्पष्ट बोलणे टाळलेले पोषक राहील.सध्या आपण म्हणाल ती पूर्वदिशा असणार आहे. तरिसुध्दा समोरच्याचे म्हनने ऐकून घ्यावे लागेल.कौटुंबिकस्तरावर वावरतांना समाधानात वाढ होईल.चांगली स्थिती निर्माण होईल.कामे करतांना योग्य नियोजनातुन काय बोलता ते स्विकारले जाईल.प्रतिष्ठेत चांगली वाढ होऊ शकेल.रविबदल लाभदायक ठरेल.मंगळबदल आर्थिक लाभ देईल.व्यवसायात उत्तम प्रगती होऊशकेल.नोकरदार वर्गाला कामावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करावे लागेल.यश मिळेल.
**महिला-**आर्थिकविवंचना सहजतेने दूर करु शकाल.समाजसेवेची आवड राहु शकेल.मुलांची प्रगती होऊ शकेल. उपस्थितिने घरगुती वातावरण आनंदी राहु शकेल.
**विद्यार्थी-**प्रकृती उत्तम असेल.
शुभदिनांक-१५-१६-१७.

**कर्क-यश मिळवु शकाल.**
ग्रहप्रभावपहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना यशाचे स्तर वाढवु शकाल.निर्णय घेतांना गोंधळुन जाऊ नका. कौटुंबिकस्तरावर वावरतांना चांगला प्रतिसाद मिळु शकेल.कोर्टातिल कामांना गति मिळु शकेल.हक्कही मिळु शकेल.कालावधी बर्यापैकी बरा असु शकेल. या कालावधीमध्ये बाकी राहिलेली बहुतांशी कामे होऊन जातील.तेव्हा घाई करून कामे करण्याचा प्रयत्न करत चला.रविबदल पोषक राहील.मंगळबदल बर्यापैकी बराराहु शकेल.व्यावसायिकदृष्ट्या केलेली गुंतवणूक फायद्याची ठरु शकेल.नोकरदार वर्ग वरिष्ठांची शाब्बासकी वेळीच मिळु शकेल.उपासना वाढवत चला.
**महिला-**शक्यतोविशेषआर्थिक चणचण भासणार नाही. घरामध्ये स्थावर मालमत्तेचा प्रश्न निकालात लागु शकेल. मालकी हक्क मिळेल.आरोग्याच्या तक्रारी दूर होतील,
**विद्यार्थी-**मनस्वास्थ्य लाभले.
**शुभदिनांक-१७-१८-१९.**

**सिंह-संघर्ष करावा लागेल.**
ग्रहसंकेत पहाताप्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना शांततेने व वेळेत पूर्ण करावे लागतील.यासप्ताहातील सर्व दिवस संघर्षाचे असु शकतील हे विसरु नयेत.कोणत्याही कामाची काळजी करण्याची बेफिकिरी चालणार नाही.कौटुंबिकस्तरावर कमी बोलणेच बरे राहील.जबाबदारि झटकुन चालनार नाही.सामाजिक कामे करतांना "तोंडात साखर व डोक्यावर बर्फ" हे यशाचे सुत्रअंमलात आणावे.रागावर अंकुश ठेवावा लागेल.रविबदल बरा राहील. मंगळबदल फालतुखर्च कमी सुचवतोय.व्यवसायात आलेले प्रस्ताव भंपकच असु शकतील. नोकरदार वर्गाला घेतलेली जबाबदारी पार पाडावीच लागेल.
**महिला-**मनमानी करु चालणारनाही.काटकसर करतआर्थिक बचत करावी लागेल.नातेवाईकांच्या कार्यक्रमानिमित्त होनार्या भेटीगाठी कटाक्षाने टाळाव्या लागतील.
**विद्यार्थी-**आरोग्य सांभाळावे लागेल.
**शुभदिनांक-१८-१९-२०**
.
**कन्या - दडपन झटकुन टाकावे लागेल.**
ग्रहसंकेत पहाता पूर्वार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना अविश्वास कमी करावा लागेल.तरच उत्कर्षाचे वलय मजबुत होऊ शकेल.हे सर्व दिवस तसे बर्यापैकी बरे राहु शकतील.हा कालावधी धडाडीचा राहु शकेल.विश्वासाने प्रयत्न केल्यास चांगल्या कामासाठी जास्त वेळ लागणार नाही.होणारी धावपळ आता बर्यापैकी कामी येणार आहे.परिणामी थोडीशी कामातून उसंत घेता येऊ शकेल.निर्णय बरे होतील.रविबदल बरा राहील. मंगळबदल बर्यापैकी असेल.उपासना वाढवावी.
व्यवसायात चाललेल्या घडामोडींत जबाबदारीने पाऊल टाका.नोकरदार वर्गाचे कामकाज सुरळीत चालू राहील.
**महिला-**आर्थिक नियोजन मार्गी लागु शकेल.केलेले प्रयत्न यशात हळुवारपणे परिवर्तित होऊ शकतील.कदाचित राजकीय क्षेत्रात बर्यापैकी मानाचे स्थान मिळु शकेल.
**विद्यार्थी-**आरोग्य बरे राहील.
**शुभदिनांक-१४-१५-१६.**

**तूळ-लाभास पोषक आठवडा असेल.**
ग्रहसंकेत पहाता संपूर्ण सप्ताह लाभदायक जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना उत्तम सफलता मिळवु शकाल. रखडलेली महत्त्वाचीकामे पोषक होऊ शकतील.सप्ताहातील सर्वच दिवसांचा कालावधी उत्तम राहु शकेल.अचानक धनलाभ होतील.चांगला कालावधीत चांगल्या गोष्टी घडतात असे म्हणायला हरकत नाही.सध्या असेच चांगले वातावरणआहे.कोणत्याही गोष्टीसाठी संघर्षकरावा लागणार नाही.महत्त्वाची कामे पूर्ण होतील.रविबदल पोषक राहील.मंगळबदल पोषक असु शकेल.व्यवसायात हाती घेतलेले सर्व काम तडीस नेऊ शकाल. नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे सहकार्य उत्तम मिळु शकेल. आनंदी सप्ताह.
**महिला-**आर्थिक बाबतीत समाधानाची बाब राहु शकेल.कौटुंबिक वातावरण आनंदी राहु शकेल.मानसिक समाधान लाभु शकेल.मनसोक्त खरेदि करु शकाल.
**विद्यार्थी-**शारीरिकत्रास दूर होईल.
शुभदिनांक-१५-१६-१७.

**वृश्चिक-व्यवहार जपून करावेत.**
ग्रहसंकेतपहाता उत्तरार्ध सप्ताहाचा चांगला जाऊ शकेल. नियोजित कामे करतांना विनाकारण चिडचिड करु नका.तसे हेदिवस जरासे ताणतणावाचे असु शकतील.मात्र ताणतणाव घेऊन काहिही साध्य होणारनाही.त्यातून पर्यायी मार्ग वेळिच काढावेत.एकघाव दोन तुकडे करून चालणार नाही.शांततेच्या मार्गाने गोष्टी हाताळाव्या लागतील.या वातावरणात सकारात्मक विचार करायची तयारी ठेवावी लागेल.नुकसान होणारनाही.रविबदल गुंतवनुकीस बरा.होनारा मंगळ बदल चांगला राहु शकेल.व्यवसायात आव
क-जावक बर्यापैकी बरी राहु शकेल.नोकरदार वर्गाच्या कामातील तांत्रिक अडचणी दूर होतील.उपासना करावी.
**महिला-**आर्थिक व्यवहार जपून केलेले बरे राहु शकेल.समाजमाध्यमांचा वापर जेवढ्यास तेवढा करत चला.जोडीदाराचीसाथ मिळु शकेल.सकारात्मक विचारांवर भर द्या.
**विद्यार्थी-**उत्साह वाढेल.
**शुभदिनांक-१७-१८-१९.**


**धनू-सहनशीलता वाढवावी लागेल.**
ग्रहबळ पहाता प्रतिकुल सप्ताह जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना रागावर नियंत्रण ठेवत चला.सप्ताहातील हे सर्व दिवस कसे संयमाने घालवता येतील तेपाहाणे बरे. काही गोष्टी मनाविरोधी घडू शकतात.त्यामुळे रागाचा पारा अचानक चढू शकतो.परिणामी बरेच काही नुकसानही होऊ शकते.एक गोष्ट लक्षात ठेवावे.अशावेळी शांत राहणे खूप गरजेचेअसते.नुकसान होणार नाही. सहनशीलता वाढवा.रविबदल पोषक राहु शकेल.मंगळबदल आहार नियंत्रण सुचवतो आहे.मनापासुन उपासना करत चला.
व्यवसायात नियोजन यशस्वी करण्यासाठी धावपळ होईल.नोकरदार स्विकारलेल्या कामात व्यस्त राहावे लागेल.
**महिला-**फालतु खर्च वेळीच कमी करावे लागतील.जोडीदाराचा सल्ला घ्यावा लागे.आध्यात्मिक गोष्टीत गुंतून राहावे लागेल.नियमीत उपासनेवर वेळिचभर द्यावा लागेल.
**विद्यार्थी-**शारीरिक स्वास्थ्य जपा.
शुभदिनांक-१८-१९-२०.

**मकर-यशाचे गणीत जुळुन येईल.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा पूर्वार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना बर्यापैकी सफलता मिळु शकेल.यास्पाहात सर्व दिवसांचा कालावधी तसा बर्यापैकी बरा राहु शकेल.कौटुंबिकस्तरावर बरे वातावरण आले आहे.तेव्हा उगाचच वेळ घालवत बसूनका.पुरेपूर वापर करूनघ्यावा.जेकाम करायचे आहे त्या कामाचा श्रीगणेशा आता करायला हरकत नाही.सध्या काम बर्या पैकी होणार आहे.रविबदल चागला राहील.मंगळबदल बर्यापैकी पोषक राहु शकेल."मन चंगातो कखोटमे गंगा" मन प्रसन्न ठेवत चला.व्यवसायातून अपेक्षेपेक्षाही बरे प्रमाणात उत्पन्न मिळेल. नोकरदार वर्गाचीं कामे वेळेतच पूर्ण होऊ शकतील.
**महिला-**आर्थिक अडचण तितकिसी जाणवणार नाही.कदाचित राजकीय क्षेत्रात प्रतिष्ठा वाढु शकेल.नातेवाई कांशी जिव्हाळा वाढेल.मानसिक तणाव कमी होईल.
**विद्यार्थी-**आरोग्य मध्यम राहील.
**शुभदिनांक-१४-१५-१६.**

**कुंभ-यशस्वी आठवडा जाईल.**
ग्रहबळ पहाता संपूर्ण सप्ताग लाभदायक जाऊ शकेल.नियोजित कामे करतांना अनुकूल वातावरण असु शकेल.सर्व दिवसांचा कालावधी उत्तम राहील. या कालावधीत वरिष्ठांची मदत मिळेल.कामाव्यतिरिक्त इतर गोष्टीत लक्ष घालायला वेळ मिळणार नाही.तुमची कामे मात्र साध्य होणारआहे.मार्गदर्शन सध्या मोलाचे ठरणारआहे.कौटुंबिकस्तरावर वावरतांना "आनंदीआनंद घडे चोहिकडे"असे अनुभव मिळु शकतील.प्रतिष्ठा वाढेल.रविबदल भाग्यकारक राहील.मंगळबदल वादाविवादा पासुन दूरता सुचवतोआहे. व्यवसायात लाभाचे प्रमाण उत्तम राहु शकेल.नोकरदार वर्ग काम करताना कोणतीही तडजोड स्वीकारु नका.
**महिला-**दडपन जाणवणार नाही.आर्थिक सफलता मिळु शकेल.राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या गोष्टीवर चर्चा होईल. घरगुती वलयअनुकूल असेल. मानसिक समाधान लाभेल.
**विद्यार्थी-**प्रकृती ठणठणीत असेल.
**शुभदिनांक-१५-१६-१७.**

**मीन-बर्यापैकी पोषक सप्ताह.**
ग्रहबळ पहाता सप्ताहाचा उत्तरार्ध चांगला जाऊ शकेल.नियोजितकामे करतांना समाधानात हळुहळु वाढ होऊ शकेल.यासर्व दिवसांत कोणतेही निर्णय घेताना विचार करुनच घेणे बरे राहील.विचार केल्याशिवाय घाईने निर्णय घेऊ नका.जेथुन मनस्ताप होणार आहे तिथे शांत राहणे बरे.कामाची जबाबदारी झटकूनका.चांगल्या गोष्टींसाठी उशीर झाला तरी चालेल.हे ब्रीदवाक्य ध्यानी ठेवावे लागेल.हा कालावधीही बरा असेल.रविबदल चांगला राहील. मंगळ बदल पोषक असु शकेल.मनापासुन उपासना करावी.व्यवसायातून बर्यापैकी मनासारखे उत्पन्न मिळु शकेल.नोकरदार वर्गाला कदाचित अधिकारप्राप्ती होऊ शकेल.
**महिला-**आर्थिकप्रश्न बर्यापैकी मिटु शकल.कुटुंबातअसणारे मतभेद दूर होण्यासाठी प्रयत्न वाढवावे लागतील.
नातेवाईकांच्या सुखदु:खात सहभागी व्हावे लागेल.
**विद्यार्थी-**प्रकृती जपत चला.
**शुभदिनांक-१७-१८-१९.**

# चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू : किशोर कुमार



**हिंदी चित्रपट सृष्टीतील** अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी किशोर कुमार यांचे निधन झाले. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार, पुणे**

## पत्र मानस

### हरियाणा निकालाचा परिणाम महाराष्ट्रावर होणार नाही

भाजपने हरियाणात ९० पैकी ४९ जागा जिंकून बहुमत सिद्ध केले. काँग्रेसला ३७ जागांवर समाधान मानावे लागले.हरियाणा विधानसभेत काँग्रेस सत्तेवर येईल असा अंदाज निवडणुकीतील प्रकारातून दिसत होता काहींनी तसे अंदाज व्यक्त केले होते.मात्र मतमोजणीनंतर भाजपने बहुमताचा आकडा पार केला.हरियाणात काँग्रेस अंतर्गत दुफळी कारणीभूत ठरली.सत्तेचा हव्यास नडला काहीणी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले.आपल्याच पक्षाच्या विरोधात उभे राहिल्याचा हा परिणाम आहे.त्यामुळेच काँग्रेसचे संख्याबळ घटले.पाच वर्षे विरोधात बसून लोकांची कामे करा मजबूत विरोधी पक्ष म्हणून काँग्रेसने काम करावे.महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक पुढील महिन्यात होण्याची शक्यता आहे.महाराष्ट्रात २८८ विधानसभेच्या जागा आहेत. सहा मोठे पक्ष तसेच काही छोटे पक्ष आणि अपक्ष उमेदवार यांची सत्ता काबीज करण्यासाठी युद्ध पातळीवर काम सुरु आहे. हरियाणा आणि महाराष्ट्रात दोन्ही राज्यातील परिस्थिती वेगळी आहे.महायुतीचे तीन पक्ष ,महाविकास आघाडीचे तीन पक्ष, तिसरी आघाडी,समाजवादी पक्ष, वंचित बहुजन आघाडी तसेच अपक्ष उमेदवार यांचा कस लागणार आहे. महाराष्ट्रातील निवडणूक महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले.३१ उमेदवार निवडून आले.तसेच,काही तांत्रिक कारणाने पराजित झालेले उमेदवार न्यायालयात गेले आहेत. महाराष्ट्रात मागील दोन-तीन वर्षांत पक्ष फोडीचे राजकारण करून महाराष्ट्रातील सत्ता बदल केला अशा हरहुन्नरी लोकांवर जनतेचा डोळा आहेच. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अरबी समुद्रातील स्मारकाचे भूमीपूजन पंतप्रधान करतात पण स्मारक उभे राहत नाही. मालवण येथील छत्रपतींचा पुतळा कोसळणे या बाबी महाराष्ट्रातील जनता डोळयासमोर आणणार. महाराजांच्या नावाचा वापर करून २०१४ ची विधानसभा लढवली होती.शिवसेनेवर केलेला आघात मराठी माणसाच्या वर्मी बसला आहे.महाविकास आघाडीतील पक्षांनी स्वतंत्र निवडणूक लढवून नंतर एकत्र यावे नाहीतर हरियाणा होईल.सांगली लोकसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवार निवडून आला पक्षाचा अधिकृत उमेदवार काँग्रेसच्या नेत्यांनीच पाडला तो लाखभर मते घेऊ शकला नाही.म्हणून उद्धव बाळासाहेब ठाकरेंनी आता, ताकही फुकून प्यावे.लोकसभेत उद्धव बाळासाहेब ठाकरेंवर विश्वास ठेवून सर्व धर्मियांनी भरभरून मतदान केले होते.भाजपचे नेते जेवढे ठाकरे सेनेवर आघात करतील त्याच्या उलट प्रतिक्रीया उमटणार हे लक्षात घ्यावे.लोकशाहीत मतदान हेच श्रेष्ठ आहे.चांगले उमेदवार असतील तर लोक स्वतःच मतदानास जातील ज्यांनी दहा - पंधरा वर्षे सत्ता भोगून लोकांना आवश्यक असलेल्या सेवा दिल्या नाहीत त्यांना घरी बनवतील.तेव्हा पक्षानेच उमेदवार देताना उमेदवाराचा इतिहास पाहावा नंतर भुगोलाकडे पाहावे.

**- महादेव गोळवसकर, मुंबई**

### वैयक्तिक चिखलफेक करण्याविरोधात कारवाई हवी

आज देशासमोर, राज्यासमोर अनेक प्रश्न आ वासुन उभे आहेत. महागाई हा प्रश्न तर गेली अनेक वर्षे गरीबांना, मध्यमवर्गीयांना नेहमीच सतावत आलेला आहे. जनतेच्या मूळ प्रश्नावर राजकीय पक्षांनी व्यक्त होणे महत्वाचे आहे. पण सत्ताधारी यावर व्यक्त होतच नाहीत. भ्रष्टाचार देशात वाढला आहे की नेतेच भ्रष्टाचारी झाले आहेत. वाढती लोकसंख्येला धरबंध राहिलेला नाही. शिक्षण व वैद्यकिय सुविधा याची बोंब आहे. रोजगार व नोकरी यात तरूण पिढी चिंताग्रस्त आहे. पुराची समस्या, पिण्याच्या पाण्याचे प्रश्न, गरीब श्रीमंत दरी या प्रश्नांकडे विचार करण्याऐवजी वैयक्तिक चिखलफेक करून जनतेला गुमराह केले जात आहे. निवडणुक होणार आहे हे माहिती झाल्यावर सर्व प्रचारच वैयक्तिक चिखलफेक करण्यावर उधाण येते.अन तेच तेच विषय चघळत बसतात. यात जनतेचे केवळ मनोरंजन होते.व त्या व्यक्तिचे चारित्र्य हनन होते. निवडणुक आचारसंहितेत चिखलफेक करण्याविरोधात कारवाईची तरतुद करणारे कलमच समाविष्ठ केले पाहिजे. " समान नागरी कायदा व एक देश, एक निवडणुक " या विषयावरील गहन प्रश्न आहेतच.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर. अंधेरी**

### एकत्रित निवडणूकीला विरोध दुर्दैवी

पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने देशात 'एक देश,एक निवडणूक' नजदीकच्या काळात करण्याचा पूर्णपणे ठरवले आहे. इंडिया आघाडी अर्थात विरोधकानी सुरवातीलाच या प्रस्तावाला विरोध केलेला आहे. देशातील निवडणूक प्रक्रिया जलद व सुलभ होण्यासाठी तसेच जनतेचा पैसा वाचविण्याचा मुख्य हेतू समोर ठेवूनच केंद्र सरकारने भारतीय निवडणूक सुधारणा बील आणलेले आहे. देश स्वातंत्र्य झाल्यानंतरच्या सुरवातीच्या काळातील निवडणूका एकत्रित म्हणजेच लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्रित झाल्या होत्या. तेव्हा आता अशाच पद्धतीने एकत्रित निवडणूक घेण्याचा केंद्र सरकारच्या अभूतपूर्व निर्णयाला विरोधकानी केलेला विरोध म्हणजे घटनाबाह्य कृती ठरु शकते. केरळ सरकारने तर मोदीसरकारचा 'वन नेशन,वन इलेक्शन' प्रस्तावच थेट त्यांच्या विधानसभेत ठराव करुन लगेचच नामंजूर देखील केला आहे. थोडक्यात निवडणूक हा विषयच केंद्राचा असल्यामुळे कोणत्याही राज्याने एकत्रित निवडणूकीला विरोध करणे ही बाब देशहितासाठी दुर्दैवी ठरणार आहे असे वाटते.

**- श्री संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

## देशभरात दसऱ्याचे सेलिब्रेशन दिल्लीच्या लाल किल्ल्यावर रावण दहन

**नवी दिल्ली :** देशभरात आज दसरा साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी दिल्लीतील लाल किल्ल्यावर रामलीला येथे पोहोचले. या दोघांनी प्रतिकात्मक बाण मारून रावणाचे दहन केले. याआधी पंतप्रधान आणि राष्ट्रपतींनी राम, लक्ष्मण आणि हनुमान यांच्या भूमिका साकारणाऱ्या कलाकारांना टिळा लावला. लाल किल्ल्यातील माधव दास उद्यानात आयोजित या रामलीलाचे आयोजन श्री धार्मिक लीला समितीने केले आहे. समितीच्या सदस्यांनी राष्ट्रपती मुर्मू यांना त्रिशूळ आणि पंतप्रधान मोदींना गदा दिली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे सैनिकांसोबत सण साजरा करण्यासाठी पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग येथे पोहोचले. संरक्षणमंत्र्यांनी सर्वप्रथम सुकना कॅन्टमध्ये शस्त्रांचे पूजन केले. नंतर तेथे उपस्थित सैनिकांना टिळा लावला.



# जामनेरमध्ये भव्य शिवसृष्टी आणि भीमसृष्टीचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत लोकार्पण






**प्रतिनिधी**
■ **जळगाव**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज हे आपले आराध्य दैवत आहेत. त्यांच्या कार्य आणि विचाराची प्रेरणा घेवूनच आम्ही काम करतो. घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्याला स्वातंत्र्य, समता आणि बंधुता याची ओळख संविधानातून करून दिली. अशा दोन आदर्श युगपुरुषांचे अत्यंत भव्य स्मारकं जामनेर मध्ये झाली, याचा आपल्याला आनंद झाला असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

जामनेर येथील सोनबर्डी टेकडी परिसर विकास अंतर्गत शिवस्मारक (शिवसृष्टी) आणि भीमस्मारक ( भीमसृष्टी ) लोकार्पण सोहळ्या प्रसंगी ते बोलत होते. या सोहळ्याला केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, खा. छत्रपती उदयनराजे भोसले, खा. स्मिता वाघ, आ. छत्रपती शिवेंद्रराजे भोसले, आ. सुरेश ( राजू मामा) भोळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, जामनेर शहरात जी भव्य छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवसृष्टी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भीमसृष्टी आपण निर्माण केली आहे. ज्यांनी महाराष्ट्रामध्ये आणि देशामध्ये देव, देश आणि धर्मावर सातत्याने आक्रमण होत असताना, महिलांची विटंबना होत असताना. सर्व सामर्थ्याने लढा देऊन रक्षण केले आणि स्वराज्य स्थापन केले. अशा आपल्या राज्यांचे 350 वे राज्याभिषेक वर्ष असताना अशी भव्य शिवसृष्टी निर्माण केली हे अत्यंत आनंददायी आहे. ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्य काय असतात हे संविधानातून दाखवून दिले. अशा या महामानवाच्या विचाराचे सदैव स्मरण करू देणारी भीमसृष्टी उभी केली.

या शासनाने शेतकऱ्यांच्या , कष्टकऱ्यांच्या,महिलांच्या जीवनात बदल करण्यासाठी योजना आखल्या म्हणजे आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखविलेल्या विचाराने वाटचाल करत आहोत आणि पुढेही असेच काम करत राहू असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक व्हावे हे आम्हा जामनेरकरांचे स्वप्न होते ते आज पूर्णत्वास आले असून थोड्याच दिवसात महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्यासह, अहिल्यादेवी होळकर, महाराणा प्रताप, वसंतराव नाईक यांचे भव्य स्मारक तसेच संत सेवालाल महाराज यांची सृष्टी तयार करणार असल्याचे प्रतिपादन ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

यावेळी केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण मंत्री रक्षा खडसे यांनी जामनेर शहरात उभे असलेले दोन्ही स्मारकं आणि जामनेर तालुक्याचा झपाट्याने होणाऱ्या विकास यावेळी अधोरेखित केला. खा.छत्रपती उदयनराजे भोसले आणि आ. छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांनीही ग्रामविकास मंत्री यांच्या कार्याचे कौतुक करून भव्य स्मारक उभं केल्याबद्दल अभिनंदन करून सर्वांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या.

### अशी आहे शिवसृष्टी

- छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिंहासनाधिष्ठीत पूर्णाकृती साधारणतः १६ फुट उंचीचा ब्रांझ धातुचा पुतळा व सिहासन ३२ फुट आहे
- हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडाच्या नगारखानासहित वाड्याची भव्यदिव्य प्रतिकृती साकार केली आहे.
- या मराठामोळ्या शैलीच्या वाड्याची लांबी १०० फूट आहे आणि यात तळ मजल्यावर १२ खांब आणि पहिल्या मजल्यावर २४ खांब आहेत. वाड्याच्या बाजूच्या भिंतीची लांबी ५० फूट असून उंची वाड्याची तटबंदी धरून साधारण ३८ फूट आहे.

### अशी आहे भीमसृष्टी

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती साधारणतः १५ फुट उंचीची संविधान घेतलेली आणि राष्ट्राला उद्देश करत असलेली ही पूर्णाकृती भव्य मूर्ती साकार केली आहे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या २४ मुद्रा या त्यांना असलेल्या २४ उपाध्यांसहित कायमस्वरूपी अशा स्टील प्लेट्सवर महान विभूती गौतम बुद्धांच्या बोधिवृक्षाच्या पिंपळ पानांवर केल्या आहेत.
- डॉ. बाबासाहेबांच्या मूर्तीमागे संविधान चक्र केले असून त्यामागे बोधिवृक्ष साकार केला आहे. यातून महान गौतम बुद्धांच्या आशीर्वादाचे प्रतिबिंब आपल्याला दिसते.

## रावण दहन बंद करण्याची मागणी

# रावणाने बाप म्हणून सीतेचे अपहरण केले

## आ. अमोल मिटकरींचा वादग्रस्त दावा

**प्रतिनिधी**
■ **अकोला**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी शनिवारी विजयादशमीच्या दिनी रावण दहनाची प्रथा बंद करण्याची मागणी करून एकच खळबळ उडवून दिली आहे. एवढेच नाही तर त्यांनी रावणाच्या मंदिरासाठी तब्बल 20 लाख रुपयांचा निधी देऊन, रावणाने माता सीतेचे बाप म्हणून अपहरण केल्याचा वादग्रस्त दावाही केला आहे. त्यांच्या या विधानाचे राज्याच्या राजकारणात तीव्र पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत.

राज्यासह संपूर्ण देशात आज विजयादशमीचा सण उत्साहात साजरा केला जात आहे. या निमित्ताने देशात ठिकठिकाणी रावण दहन केले जाते. या पार्श्वभूमीवर आमदार अमोल मिटकरी यांनी आज अकोला जिल्ह्यातील सांगोळा येथे रावणाची महाआरती केली. यावेळी गावकऱ्यांसह आदिवासी समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना मिटकरी यांनी रावण दहनाची प्रथा बंद करण्याची मागणी केली.

रावणाला जाळणारे रामासारखे पवित्र आहेत का? रावण हा ज्ञानी व सत्पुरुष होता. पण त्याच्यातील चांगुलपणाकडे समाजाने दुर्लक्ष



केले. रावणाने माता सीतेचे एका बापाच्या भूमिकेतून अपहरण करत तिला सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला होता. मागच्या वर्षी रावण मंदिराच्या जिर्णोद्धाराचा निर्णय घेतल्यानंतर मला प्रचंड राजकीय अडचण झाली. त्यामुळे मला तो निर्णय मागे घ्यावा लागला. पण आता मी विविध सामाजिक संघटनांच्या मदतीने जिर्णोद्धाराचा प्रयत्न करणार आहे, असे अमोल मिटकरी म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे अमोल मिटकरी यांनी गतवर्षी रावण मंदिराच्या सभागृह व जिर्णोद्धारासाठी 20 लाख रुपयांचा निधीही जाहीर केला होता. पण त्यावरून प्रचंड आकांडतांडव झाले होते. त्यानंतर आज पुन्हा मिटकरी यांनी सांगोळ्यात रावणाची आरती केल्यानंतर रावण दहनाच्या प्रथेवर बंदी घालण्याची मागणी केली. त्यांच्या या मागणीवरून पुन्हा एकदा वाद होण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्यातील काही आदिवासी संघटनांनी यापूर्वीच रावण दहनाला विरोध केला आहे.

अकोला शहरापासून अवघ्या 40 किलोमीटर अंतरावर सांगोळा हे गाव आहे. इथे रावणाच्या सद्गुणांमुळे त्याची पूजा केली जाते. मागील 300 वर्षांपासून ही परंपरा सुरू आहे. वाईट ते सोडावे व चांगले ते घ्यावे, अशी आपल्या संस्कृतीची शिकवण आहे. दशानन रावणात अनेक दुर्गुण होते. पण त्याच्यात काही चांगले गुणही होते. याच गुणांच्या समुच्चयाने त्याची पूजा सांगोळ्यात करण्यात येते.

सांगोळा येथे रावणाची दगडात कोरलेली मूर्ती आहे. दसऱ्याच्या दिवशी या मूर्तीची पूजा केली जाते. या गावातून मन नदी वाहते. या नदीच्या काठावर ऋषीमुनीचे आश्रम होते. गावकऱ्यांची ऋषीमुनीवर खूप श्रद्धा होती. काही कालावधीनंतर मुनी कालवश झाले. गावकऱ्यांनी महाराजांची आठवण मूर्तीच्या रुपेने संवर्धन करण्याचा निर्णय घेतला होता. महाराज ज्या वडाच्या झाडाखाली तपस्या करत होते. त्या वडाच्या झाडाखाली मुनी तपस्या करत असल्याची मूर्ती तयार करण्याची सूचना त्यांनी मूर्तीकाराला केली. पण मूर्तिकाराच्या हातून मुनीच्या ऐवजी रावणाची मूर्ती तयार झाली. तेव्हापासून सांगोळा येथील गावकरी 10 तोंडे, 20 डोळे, सर्व आयुधांनी सूसज्ज असणाऱ्या 20 हातांच्या रावणाची पूजा करत आहेत.

## मी अडीच वर्षाचं रिपोर्ट कार्ड सर्वांसमोर ठेवायला तयार, हिंमत असेल तर तुम्हीसुद्धा ठेवा

**पान 1 वरुन...**

चारही बाजूंनी लोक येत आहेत. याठिकाणी भगवा उत्साह संचारल्याचे ते म्हणाले. खरं म्हणजे, महाराष्ट्र विरोधी आघाडीला घरी पाठवून आपलं सरकार आलं. तेव्हा काही लोक म्हणत होते. हे सरकार 15 दिवस टिकणार नाही. एका महिन्यात पडेल. दुसऱ्या महिन्यात पडेल. सहा महिन्यात पडेल. पण टीका करणाऱ्यांना हा एकनाथ शिंदे पुरून उरला. जनतेच्या आशीर्वादाने आणि साथीने घासून नाही तर ठासून दोन वर्षे पूर्ण केली. कारण मी बाळासाहेबांचा शिवसैनिक आणि आनंद दिघे साहेबांचा चेला आहे.




असा जाणार नाही. मला हलक्यात घेऊ नका, असे त्यांनी विरोधकांना ठणकावून सांगितले.

कोरोनामध्ये खिचडी, कफन याच्यात पैसे कोणी खाल्ले? टाळूवरचे लोणी खाणारे तुम्ही आहात. तुमच्या तोंडाला लागलेले शेण अशांनी लपणार नाही. इथे लोक मारत होती आणि तुम्ही पैसे मोजत होतात, असा आरोप त्यांनी विरोधकांवर केला. आम्ही पीपी चेक करून लोकांना मदत करत होतो हॉस्पिटलमध्ये जात होतो. तुम्ही घरात बसून करून मंत्री याला त्याला बाहेर, आमदार आला त्याला बाहेर...असं करत होता. तुम्ही काय केलं ते जाईल ते सांगू शकत नाही पण वेळ इथे योग्य वेळी मी ते सर्व सांगेन, असे ते म्हणाले.

## मुनिसिपल मजदूर संघांचे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर लोणावळा येथे संपन्न

**प्रतिनिधी**
■ **लोणावळा**

म्युनिसीपल मजूर संघ युनियन कोड क्रमांक 52 या युनियनचे अध्यक्ष मान. नाम. डॉ. रामदासजी आठवले (केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री भारत सरकार )यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कामगार, कर्मचारी यांचे विश्रामधाम, लोणावळा, येथे कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर संपन्न या शिबिराचे प्रमुख सरचिटणीस समजभूषण प्रकाश कमलाकर जाधव होते तर अध्यक्षस्थानी दिलीप थोरवडे हे होते. मार्गदर्शन करण्यासाठी सुधाकर गायकवाड,रुपेश पुरळकर, संजय कापसे,श्रावण मोरे, गौत्तम सोनकांबळे



प्रामुख्याने उपस्थित होते यांनी महापालिकेच्या कामगार विषयक कार्य पद्धतीबाबत मार्गदर्शन केले,डी एन शिर्के,खजिनदार सुनील कांबळे, पांडुरंग कांबळे, स्वप्निल विद्यागर, एस, पी.जाधव, वसंत धनाजी जाधव, नितीन कांबळे, राजेश कांबळे , गौतम महाडिक,सागर कांबळे यांनी चर्चासत्रात भाग घेऊन मुंबई महानगर पालिकेती सफाई कामगारांच्या प्रश्नावर युनियनने विशेष भर देणे गरजेचे आहे असे मत मांडले तर म्युनिसीपल को, ऑप, बँक कोणतेही ठराव मंजूर करून न घेता सभासदांना विश्वासात न घेता सी, डी, मधून पैसे कापून घेत आहेत याबाबत बँकेच्या चेअरमन,मुख्य प्रबंधक, व संचालक मंडळ यांना जाब विचारावा असे मत सर्व शिबिराला आलेल्या प्रतिनिने वक्त केले त्यानुसार बँकेच्या मुख कार्यालयावर शनिवार दिनांक 19 /10/2024 रोजी दुपारी 12 वाजता मोर्च्याचे आयोजन करून निदर्शने करण्याचे ठराविण्यात आले आहे, बोनस, कामगारांना सेवा पुस्तिका,काळबद्ध पदोन्नती, सेवानिवृत्त कामगारांची देणी या बाबत ठराव मंजूर करून युनियनने कामगारांच्या न्याय मागण्यासाठी कृतिशील कार्यक्रम निश्चित करण्याचे ठराविण्यात आले आहे बुधवार दिनांक 09 व 10 आक्टोबर 2024 रोजी विश्रामधाम, लोणावळा येथे संपन्न झालेल्या या शिबीरात कवी गायक,डी, एन, शिर्के यांनी स्वता कामगारांच्या व्यथा मांडनांरी गिते गाऊन प्रबोधन केले. यावेळी संजय गमरे,रवींद्र जगताप,विजय कुरणे, देवेंद्र सोनकोली, अंगद सूर्यवंशी, राहुल म्हापनकर, नागेश जाधव, राकेश ताम्हाणकर यांच्या सहित 24 विभागातील विविध खात्यातील कामगार, कर्मचारी उपस्तित होते दोन्ही दिवसांच्या कार्यक्रमाची उत्तम व्यवस्था युनियनचे चिटणीस श्रावण मोरे, रवींद्र जगताप, आणि नागेश जाधव यांनी केली त्याबाबत सूत्रसंचालन करताना म्युनिसिपल मजदूर संघांचे सरचिटणीस प्रकाश कमलाकर जाधव यांनी त्यांचे आभार मानले व शिबिराची सांगता झाली

# विश्वशांतीसाठी बुद्ध हाच पर्याय - आठवले

**प्रतिनिधी**
■ **नाशिक**

जगात आतंकवाद दहशतवाद माओवाद नक्षलवाद आणि युद्धातून हिंसा आणि रक्तपात होऊन अशांतता वाढत आहे. मानव जातीच्या विकासासाठी विश्वात शांतता हवी आहे. भगवान बुध्दांनी जगाला शांती अहिंसा समतेचा मानवतेचा धम्म दिला आहे. त्यामूळे विश्वशांतीसाठी तथागत गौतम बुध्द हाच पर्याय आहे असे प्रतिपादन रिपब्लीकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना रामदास आठवले यांनी केले.नाशिक च्या त्रिरश्मी लेणी च्या पायथ्याशी आज 68 व्या धम्म चक्र प्रवर्तन दिना निमित्त आयोजित कार्यक्रमात ना. रामदास आठवले बोलत होते.

यावेळी येथे रोपण करण्यात आलेल्या ऐतिहासिक महाबोधी महावृक्षा चा प्रथमवर्धापन दिन ही साजरा करण्यात आला या कार्यक्रमास विचार मंचावर प्रमूख अतिथी म्हणून केंद्रीय मंत्री ना.किरण रिजिजू ; महाराष्ट्राचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना.छगन भुजबळ ; आ.सरोज आहेर; आ.देवयानी फरांदे; जिल्हा अधिकारी जळज शर्मा; नाशिक मनपा आयुक्त करंजकर; रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा अध्यक्ष प्रकाश लोंढे; उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन नाशिक महापालिका आणि शांतीदूत चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.आयोजक भदंत सुगत थेरो; भिख्खू संघ रत्न; भिख्खू



आर्यनाग; भंते खेमधममो; भंते सत्यपाल; भंते नाग धम्मो; भंते आर आनंद; भंते सुगतप्रिय; आनंद भाऊ सोनवणे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

नाशिक चे आंबेडकरी चळवळीत मोठे महत्व आहे.येवले येथे महामानव क्रांतीसुर्य डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी 13 ऑक्टोबर 1935 रोजी ऐतिहासिक धर्मांतर घोषणा केली. त्यानुसार 14 ऑक्टोबर 1956 रोजी बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथे धम्मक्रांती करीत ऐतिहासिक धम्मचक्र प्रवर्तन केले.लाखो अनुयायांना बौद्ध धम्माची दीक्षा देऊन भारतात पुन्हा एकदा बौध्द धम्म पुनर्जीवित केला बौद्ध धर्म हा धर्म नाही तर धम्म आहे. भगवान बुद्धांनी जगाला समतेवर मानवतेवर विज्ञान विचारांचा बौध्द धम्म दिला आहे. नागपूर च्या दीक्षाभूमीवर दरवर्षी लाखो लोक धम्मचक्र प्रवर्तन दिनी एकत्र येऊन महामानवाला अभिवादन करतात.तसे नाशिक ला त्रिरश्मी लेणी जवळ दर वर्षी 3 ते 4 लाख लोक एकत्र येतात.या ठिकाणी गेल्याच वर्षी पवित्र बोधी वृक्षाची शाखा लावण्यात आली असून त्याही बोधिवृक्षाचा प्रथम वर्धापन दिन आज साजरा होत असल्याबद्दल ना रामदास आठवले यांनी आयोजकांचे अभिनंदन केले.

जगात सर्वत्र भगवान बुद्धांच्या मूर्ती दिसतात .देशात सर्व जाती धर्मियांच्याघरी ; मोठ्या महालापासून हॉटेल पर्यंत अनेक ठिकाणी दर्शनी भागातच महाकारूणी भगवान बुद्धांच्या मूर्ती प्रतिमा असतात. अनेक सेलेब्रिटी जण आपल्या घरी बुद्ध मूर्ती ठेवतात.त्याचा आम्हाला अभिमान आहे .धर्म आणि धम्म यात मूलभूत फरक आहे. जगाला अहिंसा विश्वशांती विश्वबंधुता आणि विज्ञान शिकविणाऱ्या आणि अंधश्रध्दा कर्मकांड नाकारणाऱ्या धम्माची मानवतावादी शिकवण भगवान बुद्धांनी धम्मातून दिली आहे. त्यामूळे देशात खरी समता प्रस्थापित करण्यासाठी बुद्ध तत्वज्ञान सर्वांनी अंगीकारले पाहिजे असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले.

**साऱ्या देशाचे आहे नाशिक कडे लक्ष**
**कारण इथे वाढत आहे बोधिवृक्ष**
**जसा वाढत राहील बोधीवृक्ष**
**तसा वाढत राहील**
**बाबासाहेबांचा रिपब्लिकन पक्ष**

अशा अनेक कविता ना.रामदास आठवले यांनी यावेळी सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

## झाडावरची शस्त्रे आता उतरवा, ही क्रांतीची वेळ, वचपा घेण्याची वेळ

**पान 1 वरुन...**

केवळ रस्ते बांधणे आणि उड्डाणपूल उभे करणे ही प्रगती नसते. आपल्या हातात मोबाईल आला म्हणजे प्रगती नसते. तर प्रगती ही बुद्धीतून व्हावी लागते. प्रगती ही समाजाची होणे आवश्यक असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.



अनेक वर्षांपासून प्रगतीच्या थापा मारून देखील तुमच्यातला राग व्यक्त होत नसल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. त्याच - त्याच लोकांना का वारंवार निवडून दिले जात असल्याचे देखील ते म्हणाले. आणि नंतर पश्चाताप व्यक्त करत राहायचे. पांडवांनी जशी शस्त्रे शमीच्या झाडावर ठेवली होती तशी आणि मोक्याच्या वेळेला तुम्ही तुमची शस्त्र झाडावर नेऊन ठेवत आहात. मतदानाच्या दिवशी या शास्त्राचा वापर करायला हवा, असे आवाहन त्यांनी केले. निवडणुका संपल्यानंतर तुम्ही शस्त्र बाहेर काढता आणि या सर्व लोकांवर बोलत राहतात. मग मतदानाच्या दिवशी काय होते? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

हा माझ्या जातीचा, हा माझ्या ओळखीचा, असे जर करत बसला तर राष्ट्र उभे राहत नाही. आजपर्यंत तुम्ही सर्वांना संधी दिली आहे. आपलाही उद्या मेळावा होणार आहे, त्यावेळेस मी सर्व विषयांवर मी तुमच्याशी बोलणारच आहे. मात्र, या निवडणुकीत मतदारांनी क्रांती करायला हवी, असे आवाहन राज ठाकरे यांनी केले आहे. आजपर्यंत तुम्ही ज्यांना सांभाळले, त्यांनी तुमच्या मतांची प्रतारणा केली आहे. मतदारांना कायम गृहीत धरले गेले आहे. हे गृहीत धरणारेच महाराष्ट्राचे नुकसान करणारे असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. त्यामुळे दसऱ्यानंतरच्या निवडणुकीत बेसावध राहू नका. शमीच्या झाडावरची शस्त्र आता खाली उतरवा. ही क्रांतीची वेळ आहे. ही वचपा घेण्याची वेळ आहे. आताच ती शास्त्री उतरवून या सर्वांचा वेध घ्यावा लागणार असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे. गेली पाच वर्षे तुमच्या मतांशी ज्यांनी प्रतारणा केली, ज्यांनी मतांचा अपमान केला, ज्यांनी तुम्हाला गृहीत धरले, वेडी वाकडी युती आणि आघाड्या करत बसले. ते आज संध्याकाळी मेळाव्यातून एकमेकांची उणीदुणी काढतील. मात्र, त्यांच्यात मतदार कुठे असेल? महाराष्ट्र कुठे असेल? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. मी अनेक वर्षापासून एका महाराष्ट्राचे स्वप्न पाहतोय. त्यासाठी संधी देण्याची विनंती देखील राज ठाकरे यांनी केली. जगाला हेवा वाटावा असा महाराष्ट्र मला घडवायचा असल्याचे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.




गोंधळपाडा, गावदेवी मंडळ, अलिबाग.



सप्त सोनेरी माता इंद्रनगर, वडखळ, ता. पेण



कळंबोली, सेक्टर १०



भायखळा येथील अखिल पंचखाते बालमित्र सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळाची आई भवानी वर्ष 51 वे



ऑंकार ऑर्चिड, कामोठे, सेक्टर २० येथील माता भवानी.



कामोठे गावदेवी



साईशा चंद्रहास शेट्टी -ठाणे कोपरी यांच्या घरातील देवीची सुबक मूर्ती



किल्ले प्रतापगड आई भवानी



बोरिवली पश्चिम येथील अपेक्स हॉस्पिटलच्या नर्सिंग स्टाफ



आई एकविरा महिला मंडळ, हाशिवरे, ता. अलिबाग



वरळी, बीडीडी म्हाडा स्टाफ



एनकेजीएसबी बँक दिंडोशी शाखेचे कर्मचारी.



के/पूर्व मनपा विभाग,परिरक्षण खाते.



केपूर्व मनपा कार्यालय, आरोग्य खाते



सप्त सोनेरी माता महिला मंडळ इंद्रनगर, वडखळ



प्रभातची माताप्रभात मित्र मंडळ, प्रतिक्षानगर, सायन कोळीवाडा, मुंबई



लक्ष्मीनारायण सोसायटी, इमामवाडा. सॅंडहर्स्टरोड.



हिल्डन पॅकेजिंग प्राव्हेट लिमिटेड , अंधेरी

## कामाच्या सन्मानासाठी घर कामगार महिलांची मानवी साखळी

**मुंबई :** घरेलु कामगार महिलांच्या कामाला समाजात आणि सरकार दरबारी सन्मान मिळावा म्हणून जागृती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य घर कामगार युनियनच्या वतीने १० ऑक्टोबर रोजी पवई आय आय टी येथे पदयात्रा,पोस्टर प्रदर्शन आणि मानवी साखळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. युनियनच्या वतीने सुनंदा नेवसे यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. असंख्य घर कामगार महिलांनी यात सहभाग नोंदवला.७ ऑक्टोबर या आंतरराष्ट्रीय सन्मानजनक कामाच्या दिनानिमित्त विविध ठिकाणी कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. घरेलु कामगार महिलांनी हातात पोस्टर घेऊन,घोषणा देऊन आपल्या मागण्याचा जागर मांडला होता.घरेलु कामगार कायदा करण्यात यावा.घरेलु कामगार महिलांच्या अधिकार आणि विकास कामांसाठी त्रिपक्षीय मंडळ स्थापन करण्यात यावे,घरेलु कामगार महिलांची योग्य आणि जलद नोंदणी व्हावी,त्यांना पेन्शन मिळावी आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.



## चालत्या लोकलमधून चोरट्याने तरुणीच्या गळ्यातील सोन्याची चैन खेचून पोबारा

प्रतिनिधी

■ मुंबई

गोरेगांव रेल्वे स्टेशन वरून दुपारी १२.३० वाजता चर्चगेट कडे निघालेली लोकल काही अंतर पुढे जाताच एका चोरट्याने सीटवर बसलेल्या १९ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीच्या गळ्यातील सोन्याची एक तोळ्याची चैन खेचून चालत्या गाडीतून उडी मारून पोबारा केला. सदर तरुणीने बोरिवली पोलिस ठाण्यात या घटनेची रितसर तक्रार दाखल केली आहे. विशेष म्हणजे त्यावेळी डब्यात इतर प्रवासी होते. पण त्यांनी केवळ बघ्याची भूमिका घेतल्याचे सदर मुलीचे म्हणणे आहे.

या संदर्भात गोरेगांव मनसेने या घटनेमुळे पुन्हा एकदा महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. ही घटना घडत असताना बघ्याची भूमिका घेणाऱ्या इतर प्रवाशांतील कुणीही का प्रतिकार केला नाही. मुंबईकर कधी नागरिक निर्भिड बनणार, असा सवाल करून लवकरात लवकर तपासास गती यावी.यासाठी आम्ही पदाधिकारी संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेणार आहोत असे बाबू सुद.यांनी सांगितले.

सदर महाविद्यालयीन मूलीचे नाव वैदेही उमाजी जोंधळे असून ती मालाड पश्चिम येथे दालमीया लॉयन्स कॉलेज मध्ये सेकंड इयर मध्ये शिक्षण घेत आहे. ती ९ ऑक्टोबर रोजी गोरेगाव येथुन दादर येथे काही कामानिमित्त जाण्यासाठी लोकल पकडुन निघाली होती. ती लोकल च्या चर्चगेट बाजुकडील महिला डब्याच्या बाजुच्या जनरल डब्यात प्रवास करत होती. सदरची लोकलपुढे जाताच तीच्या मागे उभ्या असलेल्या त्या अनोळखी चोरट्याने तिच्या गळ्यातील सोन्याची चैन जबरीने खेचुन चालु लोकल गाडीमधुन रेल्वे ट्रॅकमध्ये पश्चिम बाजुला उडी मारून पळुन गेला. ही सोन्याची एक तोळ्याची ७० हजार रुपयांची चैन होती.

महिला T-20 विश्वचषक

# ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानला हरवले पाकिस्तान स्पर्धेतून जवळपास बाहेर





वृत्तसंस्था

■ दुबई

शुक्रवारी झालेल्या T-20 विश्वचषकाच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने पाकिस्तानचा नऊ गडी राखून पराभव केला. ऑस्ट्रेलियाचा हा सलग तिसरा विजय असून यासह त्याचे सहा गुण झाले आहेत. उपांत्य फेरीसाठी पात्र ठरण्याची प्रबळ दावेदार बनला आहे. ऑस्ट्रेलियाचा शेवटचा सामना भारताविरुद्ध आहे. या पराभवासह पाकिस्तान स्पर्धेतून जवळपास बाहेर पडला आहे.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या पाकिस्तानचा संघ 19.5 षटकांत 82 धावांत सर्वबाद झाला. ऑस्ट्रेलियाने लक्ष्याचा पाठलाग करताना १ गडी गमावून हे लक्ष्य गाठले. कर्णधार ॲलिसा हिली 37 धावा करून रिटायर्ड हर्ट झाली. तर ॲलिसा पॅरी 22 धावा करून नाबाद राहिली.

पाकिस्तानचे फक्त चार फलंदाज दुहेरी आकडा गाठू शकले. पाकिस्तानची पहिली विकेट 3.4 षटकांत पडली. सलामीवीर मुनिबा अली १३ धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतली. यानंतर सदब समासही 18 धावांवर बाद झाली. पाकिस्तानी संघाला २० षटकांत एकही चौकार मारता आला नाही. पाकिस्तानचा निम्मा संघ 39 धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतला होता. सिद्रा अमीन (12 धावा), निदा दार (10) आणि इरम जावेद (12) यांनाच दुहेरी अंकी धावसंख्या गाठता आली.ऍशले गार्डनरने 4 षटकांत 19 धावा देत 4 बळी घेतले, तर ऍनाबेल सदरलँड आणि जॉर्जिया वेरहॅमने प्रत्येकी दोन गडी बाद केले.पाकिस्तानच्या नियमित कर्णधार फातिमा सनाला वडिलांच्या निधनामुळे कराचीला परतावे लागले, तर डायना बेग पहिल्या सामन्यात दुखापतीमुळे बाहेर आहे.

### अ गटात उपांत्य फेरी तिकिटासाठी भारत ,न्यूझीलंड दावेदार

*अ गटातून ऑस्ट्रेलिया उपांत्य फेरी गाठणार हे जवळपास निश्चित झाले आहे. दुसऱ्या संघासाठी न्यूझीलंड आणि भारत यांच्यात लढत आहे. टीम इंडियाचे 3 सामन्यात 4 गुण आहेत आणि त्यांचा रनरेट +0.576 आहे. भारताचा पुढील सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध आहे. जर भारताने हा सामना गमावला तर त्याला उपांत्य फेरी गाठणे कठीण होईल.न्यूझीलंडचे दोन सामने आहेत. त्याला पाकिस्तान आणि श्रीलंकेविरुद्ध खेळायचे आहे. न्यूझीलंडने दोन्ही सामने जिंकले तर उपांत्य फेरी गाठणे सोपे होईल.या गटातील पाकिस्तानच्या आशा संपुष्टात आल्या आहेत. संघाचे 3 सामन्यांतून 1 विजयासह 2 गुण आहेत. पाकिस्तानचा न्यूझीलंडविरुद्ध सामना आहे. तो जिंकला तर पुढचा सामना न्यूझीलंड हरेल आणि भारतही ऑस्ट्रेलियाकडून हरेल अशी प्रार्थना करावी लागेल. त्यानंतर भारत आणि न्यूझीलंडचे प्रत्येकी ४ गुण होतील आणि दुसरा उपांत्य फेरीचा संघ धावगतीच्या आधारावर निश्चित केला जाईल. सध्या पाकिस्तानचा रन रेट भारत आणि न्यूझीलंडपेक्षा वाईट आहे.तर ब गटात वेस्ट इंडिज आणि दक्षिण आफ्रिकेने खेळलेल्या 3 पैकी 2-2 सामने जिंकले आहेत आणि ते टॉप-2 मध्ये आहेत. इंग्लंड संघाने आतापर्यंत खेळलेले दोन्ही सामने जिंकले आहेत, मात्र निव्वळ धावगतीमुळे ते गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर आहे. उपांत्य फेरी गाठण्यासाठी तिन्ही संघांमध्ये स्पर्धा सुरू आहे.*

# कसोटी संघाचे उपकर्णधारपद जसप्रीत बुमराहकडे



- **न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेसाठी भारतीय संघ जाहीर**
- **मोहम्मद शमी अद्याप फिट नाही**

वृत्तसंस्था

■ नवी दिल्ली

येत्या 16 ऑक्टोबरपासून न्यूझीलंडविरुद्ध सुरू होणाऱ्या कसोटी मालिकेसाठी 15 सदस्यीय भारतीय संघाची घोषणा करण्यात आली आहे. याशिवाय चार प्रवासी राखीव ठेवण्यात आले आहेत. जसप्रीत बुमराहला उपकर्णधार बनवण्यात आले आहे.बांगलादेशविरुद्धच्या दोन सामन्यांच्या मालिकेसाठी भारतीय संघाच्या कोणत्याही उपकर्णधाराची निवड करण्यात आली नाही. रोहित शर्मानंतर कसोटी संघाचा भावी कर्णधार म्हणून बीसीसीआय बुमराहकडे पाहत असल्याचे बोलले जात आहे.

संघाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी अद्याप पूर्णपणे तंदुरुस्त नाही. त्याला संघात स्थान मिळालेले नाही. शमी घोट्याच्या दुखापतीतून सावरत आहे, ज्यासाठी या वर्षाच्या सुरुवातीला त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली होती. दुखापतीमुळे तो 2023च्या एकदिवसीय विश्वचषक फायनलपासून मैदानाबाहेर आहे. डावखुरा वेगवान गोलंदाज यश दयाल दुखापतीमुळे बाहेर आहे. बांगलादेश मालिकेसाठी तो भारतीय संघात होता.

न्यूझीलंडचा संघ तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी भारत दौऱ्यावर आला आहे. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात 16 ऑक्टोबरपासून तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाणार आहे. त्याचा पहिला सामना बंगळुरू येथे होणार आहे.

***न्यूझीलंडविरुद्ध तीन कसोटी सामन्यांसाठी भारतीय संघ***

*रोहित शर्मा (कर्णधार), जसप्रीत बुमराह (उपकर्णधार), यशस्वी जैस्वाल, शुभमन गिल, विराट कोहली, केएल राहुल, सर्फराज खान, ऋषभ पंत (यष्टीरक्षक), ध्रुव जुरेल (यष्टीरक्षक), रविचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज आणि आकाश दीप. प्रवासी राखीव: हर्षित राणा, नितीश कुमार रेड्डी, मयंक यादव आणि प्रसीध कृष्णा.*


***भारत दौऱ्यासाठी न्यूझीलंडचा संघ***

*टॉम लॅथम (कर्णधार), टॉम ब्लंडेल (यष्टीरक्षक), मायकेल ब्रेसवेल, मार्क चॅपमन, डेव्हन कॉनवे, मॅट हेन्री, डॅरिल मिशेल, विल्यम ओ'रुर्क, एजाज पटेल, ग्लेन फिलिप्स, रचिन रवींद्र, मिचेल सँटनर, बेन सियर्स , ईश सोधी (दुसरी आणि तिसरी कसोटी), टिम साउथी, केन विल्यमसन आणि विल यंग.*

### भारतीय संघाची फलंदाजी मजबूत

*भारतीय संघाची फलंदाजीची फळी खूपच मजबूत आहे. रोहितसोबत विराट कोहली, यशस्वी जैस्वाल, शुभमन गिल, केएल राहुल आणि ऋषभ पंत हे संघात आहेत. निवडकर्त्यांनी सरफराज खान आणि ध्रुव जुरेल यांचाही संघात समावेश केला आहे. अष्टपैलू रविचंद्रन अश्विन आणि रवींद्र जडेजा यांनाही संघात संधी मिळाली आहे.*

# शंतनूचा समजुतदार मित्र...



**देशातील** साव्यासाची उद्योगपती, देशाभीमानी रतन टाटा यांची दोनच दिवसांपूर्वी एक्झीट झाली. देशासाठी सारंकाही करण्याची उमेद असलेला टाटांसारखा उद्योगपती झाला नाही होणार नाही, अशी बोलकी प्रतिक्रिया सर्वसामान्यांची आहे. तरूणांचं व्यासपीठ समजल्या जाणाऱ्या सोशल मिडियावर नव्वदीतला हा उद्योगपती सामान्यांच्या सुख दु:खात सहभागी होतो. प्रचंड संपत्तीचा मालक असलेल्या या महायोग्याला श्रीमंतीचा माज नाही की प्रसिध्दीचा सोस. या महान उद्योगपतीची एका विशीतल्या तरुणाशी दोस्ती होणं हे कल्पनेबाहेरील सत्य आहे. हीच दोस्ती भारतातील सर्वात यशस्वी उद्योगपतीला सोशल मीडियावरचा स्टार बनवून गेली. शंतनू नायडू हे त्या तरूण दोस्ताचं नाव. शंतनूनेच टाटांना सोशल मिडियाच्या जगाशी जोडलं. या तरुणाच्या आग्रहामुळेच टाटा अखेरच्या काही वर्षांत सोशल मीडियावर तरूणाईच्या गळ्यातील ताईत बनले. टाटा यांचा सोशल मीडियावरील वावर हा इंटरनेट वापरकर्त्यांचा आवडीचा विषय बनला. सोशल मीडियावरील खात्यांवर ते कधी स्वत:चा जुना फोटो, कधी त्यांच्या कुत्र्यांचे फोटो तर कधी आपल्या कुटुंबाचे फोटो पोस्ट करायचे. या फोटोंना तितकंच रंजक आणि विनोदी कॅप्शन देखील द्यायचे. मागच्या पाच दशकांपासून भारतीयांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या आणि वेगवेगळ्या उद्योगक्षेत्रात नाव कमावलेल्या या उद्योगपतीचं खासगी आयुष्य कसं आहे, याची झलक त्यांच्या चाहत्यांना मिळावी, यातून त्यांना प्रेरणा घेता यावी, यासाठी मी त्यांना सोशल मीडियाचा वापरायचा सल्ला दिला होता, असं शंतनू सांगतो. घनिष्ठ मित्र बनलेले शंतनू आणि रतन टाटा हेअरकट ठेवण्यापासून चित्रपट बघण्यापर्यंत सगळ्या गोष्टी सोबत करत. शंतनू सांगतो की त्यांची ही मैत्री लोकांसाठी जितकी आश्चर्यकारक होती तितकीच त्यांच्यासाठी मौल्यवान देखील होती. पुढे रतन टाटांचा सहाय्यक म्हणूनही शंतनूने काम केलं. ते कडक शिस्तीचे बॉस, दूरदृष्टीचे मार्गदर्शक आणि तितकेच समजूतदार मित्रदेखील होते. मोठे डोळे आणि कुरळ्या केसांचा हा अवघ्या 25 वर्षांचा मुलगा जगातील सर्वात यशस्वी उद्योजकांमध्ये गणल्या जाणाऱ्या रतन टाटा यांचा इतका जवळचा सहकारी आणि मित्र कसा बनला?

मी टाटामध्येच कामाला होतो. आमच्या चार पिढ्या या टाटा उद्योगाशी जोडल्या गेल्या आहेत. साक्षात टाटा समुहाच्या प्रमुखांसोबत जोडलं जावू याची मलाही कल्पना नव्हती. तशी माझी रतनजींबरोबरील भेट हा केवळ योगायोगच होता. श्वान प्रेमाचा धागा या भेटीला कारणीभूत ठरला.

टाटामध्ये काम करत असतानाच सामाजिक उपक्रमही मी चालवायचो. भटक्या कुत्र्यांना शोधून त्यांच्या गळ्याभोवती चमकणारा रेडियमचा पट्टा बांधला जात असे. जेणेकरून हे कुत्रे गाडीचालकांना रात्रीसुद्धा दिसू शकतील. अंधारात गाड्यांसमोर कुत्रे आल्याने अनेकदा अपघात होतात. यात अनेक कुत्रे गंभीर जखमी होतात किंवा मरणही पावतात. असे अपघात रोखण्यासाठी 'मोटोपॉज' उपक्रम सुरू केला. श्वानप्रेमी असलेल्या रतनजींच्या नजरेतून ही गोष्ट सुटली नाही. त्यांनी पत्र पाठवून मला बोलवून घेतलं. भटक्या कुत्र्यांची काळजी आणि श्वानप्रेम हा आम्हाला जोडणारा समान धागा ठरला. भटक्या कुत्र्यांना पाळणारा कोणी पालक मिळावा. त्यांना अन्न, निवारा आणि प्रेम मिळेल हा यामागचा उद्देश. कॉलेजच्या सहकारी मित्रांना सोबत घेत आमचा हा उपक्रम सुरू होता. यानिमित्ताने माझी रतनजींबरोबर पहिली भेट झाली. रतनजींची साथ मिळाल्याने मोटोपॉज हा उपक्रम वेगाने वाढला. कामानिमित्त सुरू झालेला आमचा संपर्क हळूहळू वाढत गेला. या ओळखीचं रूपांतर मैत्रीत झालं. त्यानंतर कामाव्यतिरिक्तही आम्ही एकमेकांच्या वैयक्तिक गोष्टींबाबत गप्पा मारू लागलो. मैत्री फुलत असताना मला भारत सोडावं लागलं. शिक्षणासाठी अमेरिकेत जाण्याचा निर्णय घरच्यांनी घेतला. पण यामुळे रतनजींबरोबर कोणताही दुरावा आला नाही. उलट दूरच्या व्यक्तीविषयीची आत्मियता वाढते असं म्हणतात तशी जवळकी वाढत गेली. रतनजी ज्या विद्यापीठात शिकले त्याच कॉर्नेल विद्यापीठात मलाही शिक्षणाची संधी मिळाली. अमेरिकेत असताना मी रतनजींबरोबर फोन आणि ईमेलच्या माध्यमातून संपर्कात होतो. शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यापीठात पदवीदान समारंभ होता. या समारंभाची माहिती रतनजींना मी सहज म्हणून दिली. ते या समारंभाला येतील, याची किंचितही माहिती मला नव्हती. पण ते खरंच आले. माझा तर सुरुवातीला विश्वासच बसला नाही. शिक्षण पूर्ण झाल्यावर मी भारतात परतलो आणि रतनजींनी मला त्यांचा सहाय्यक म्हणून नेमून टाकलं. मुंबईत एक प्राण्यांसाठी खास हॉस्पिटल उभारावं हे रतनजींचं फार जुनं स्वप्न होतं. या प्रकल्पावर काम करायला मी सुरूवातही केली. काही दिवसांपूर्वीच हॉस्पिटल तयार होऊन त्याचं अनावरण देखील करण्यात आलं.

रतनजींसोबत काम करायची संधी मिळणं ही माझ्या जीवनातील सर्वात मोठी उपलब्धी होती. तरुणांसोबत काम करायला रतनजीही खूप उत्सुक असायचे. तरुणांबरोबर काम करताना आपल्याला ऊर्जा मिळते, असं रतनजी सांगायचे. मलाही त्यांच्या उत्साहाचा अनेकदा अनुभव आला. मेहनती असण्याबरोबरच संवेदनशीलता जपणाऱ्या तरूणांची आज देशाला गरज आहे, असं रतनजी नेहमी बोलून दाखवत. रतनजी हे कामाच्या बाबतीत अतिशय तत्पर आणि शिस्त पाळणारे होते. त्यांच्या कार्यालयातील बैठकांचे मुद्दे मी वहीत नोंदवून त्याचा अंमल आणि नियोजनाची आखणी करायचो. दिवस सुरू होताच दिवसभरात कोणकोणती कामं करायची याची यादी त्यांच्याकडून निश्चित करून घ्यायचो. ठरलेली कामं पूर्ण करण्याची जबाबदारी मी घ्यायचो.

कामात हलगर्जीपणा त्यांना अजिबात आवडत नसे. कोणतंही काम मध्येच सोडून दिलं किंवा विश्रांती घेतली, असं मी कधीच पाहिलं नाही. टाटा उद्योग समुहाव्यतिरिक्त रतनजींनी 73 भारतीय स्टार्टअप उद्योगांमध्ये गुंतवणूक केली होती. आज प्रचंड यशस्वी ठरलेल्या ओला कंपनीवर विश्वास दाखवलेल्या मोजक्या गुंतवणूकदारांमध्ये रतनजी एक होते. उद्योजक किंवा उद्योगाची क्षमता ओळखून तिला चालना देण्याची दूरदृष्टी रतनजींकडे होती.

माझ्या सल्ल्याने आणि मदतीने रतनजींनी स्वत:चं इंस्टाग्राम खातं उघडलं होतं. आपल्या खाजगी आणि वैयक्तिक जीवनातील पैलू चाहत्यांपुढे ठेवण्याबरोबरच उद्योग आणि व्यवसाय करण्यासाठी मार्गदर्शनही ते इन्स्टाग्रामवरील पोस्टमधून करायाचे. इंस्टाग्रामचा वापर नेमका कसा करायचा हे मी रतनजींना समजून सांगितलं. पुढे ते इंस्टाग्रामशी अधिक जोडले गेले. त्यांनी आपले तरूणपणीचे जुने फोटो टाकत आठवणींना उजाळा दिला. या फोटोंना दिलेल्या नवनव्या कॅप्शन आणि हॅशटॅग प्रचंड गाजले. नव्वदीकडे येत असतानाही उद्योगातील प्रत्येकजण मित्रत्वाच्या नात्यानेच त्यांच्याकडे ओढला जायचा.

रतनजी आणि मलाही ॲक्शन कॉमेडी चित्रपट खूप आवडायचे. 'द अदर गाईज' आणि 'द लोन रेंजर' सारखे चित्रपट आम्ही सोबतीनेच पहायचो. नेटफ्लिक्स वरील फौदा ही इस्त्रायली लष्करावर आधारलेली सिरीज त्यांना खूप आवडायची. कुठलीही गोष्ट मला खटकली अथवा नाराज असलो की मी पहिल्यांदा रतनजींना फोन करायचो. ते सुद्धा त्यांना येणारी अडचण किंवा आनंदाचे क्षण माझ्याशी शेअर करायचे. रतनजींच्या रुपाने अंधारातून प्रकाशाची वाट दाखवणारा मार्गदशक गमावल्याची भावना आहे. रतनजींच्या जाण्याने मी अत्यंत जवळचा मित्र गमावला. त्यांच्या नसण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढणं मला शक्य नाही. मी त्यांचा शतश: ऋणी आहे...

**(साभार: बीबीसी)**

**संकलन : प्रवीण पुरो**

## कंत्राटदाराने चालक पुरविण्यास असमर्थता दाखवल्यामुळे दुसऱ्या दिवशीही बेस्ट चालकांनी काढल्या बसगाड्या बाहेर

■ मुंबई

बेस्ट उपक्रमात भाडे तत्वावरील बसगाड्यापुरविणाऱ्या हंस कंपनीने दुसऱ्या दिवशीही आपल्या बस गाड्यांवर चालक कर्मचारी न पाठवल्यामुळे त्या बसगाड्या बेस्ट उपक्रमाच्या बस चालकांनी बाहेर काढून प्रवाश्यांची होऊ घातलेली गैरसोय दूर केली.

बेस्ट उपक्रमाच्या मरोळ, दिंडोशी आणि ओशिवरा या तीन आगारात हंसा कंपनीच्या २६२ बसेस भाडेतत्त्वावर चालवल्या जातात. पण शुक्रवारी कंपनीने आपल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामावर पाठवलेच नाही. त्यामुळे बेस्ट उपक्रमाच्या बस चालकांनी या बसेस बाहेर काढल्या. काल दुसऱ्या दिवशीही कंपनीने चाल पाठवण्यास असमर्थता दाखवली त्यामुळे कालही बेस्ट च्या चालकांनी कंत्राटदारांच्या बस गाड्या बाहेर काढून प्रवाश्यांना सेवा दिली.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वीच बेस्ट प्रशासनाने हंसा कंपनीचे पैसे पेड केले आहे. कंपनीने ही आपल्या कर्मचाऱ्यांचे वेतन दिले असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्या नंतरही त्यांनी चालक कर्मचाऱ्यांना न पाठवल्यामुळे त्यांना बेस्ट उपक्रमा सोबत केलेला करार मोडायचा असेल अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. जर कंपनीने मध्येच असा करार मोडल्यास उपक्रम त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करेल पउपक्रमातून २६२ बस कमी होतील परिणामी प्रवाशांचे हाल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे

बेस्ट उपक्रम मुंबईकरांना बस सेवा आणि अखंड वीज पुरवठा सेवा बहाल करते. वास्तविक, बेस्ट उपक्रम गेल्या काही वर्षांपासून कोट्यवधी रुपयांनी तोट्यात सुरू आहे. या बेस्ट उपक्रमाला आपल्या कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन , निवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांची देणी देणे, नवीन बसगाड्या खरेदी करणे यासाठी आवश्यक निधी नाही. त्यामुळे दरवर्षी मुंबई महापालिका बेस्ट उपक्रमाला ८०० कोटी रुपये तर कधी कधी त्या पेक्षाही जास्त कोटींची आर्थिक मदत करते. गतवर्षी बेस्ट कर्मचाऱ्यांना महापालिका कर्मचाऱ्यांच्या प्रमाणे चांगला बोनस दिला होता. बेस्ट उपक्रमाने तोट्यामधून बाहेर पडण्यासाठी बेस्ट परिवहन विभागात भाडे तत्त्वावर बसगाड्या चालवायला घेतल्या. या बसगाड्यांवर बेस्टचेच बसचालक व वाहक असतील, असा शब्द बेस्ट प्रशासनाने भाडे तत्वावर बसगाड्या घेण्यास विरोध करणाऱ्या कामगार संघटनांना दिला होता. मात्र नंतर या सर्व भाडे तत्वावरील बसगाड्यांवर अखेर कंत्राटी कामगार बसचालक आणि वाहक म्हणून ठेवले आहे. त्याचे परिणाम बेस्टला वेळोवेळी अनुभवावे लागत आहेत.

## आज विलेपार्ले पूर्व येथे पालिकेच्या पहिल्या अभ्यासिकेचे उद्घाटन व नामकरण समारंभ

**मुंबई :** आज बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पहिल्या स्वतंत्र बांधलेल्या एक मजली अभ्यासिकेची उद्घाटन आणि या अभ्यासिकेला नाव देण्याचा समारंभ विलेपार्ले पूर्व विभागातील सुभाष रोड येथे पार्ले टिळक विद्यालय असो. चे अध्यक्ष अनिल गानू यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून स्थानिक आमदार पराग अळवणी तसेच दीपकजी घैसास, आचार्य पवनजी त्रिपाठी (उद्योजक, अर्थतज्ञ) (कोषाध्यक्ष - श्री सिध्दीविनायक मंदिर, न्यास) उपस्थित राहणार आहेत.या अभ्यासिकेसाठी स्थानिक प्रभाग क्रमांक ८४ चे भाजपाचे माजी नगरसेवक अभिजित सामंत यांच्या २०१९ पासून सुरू असलेल्या प्रयत्नातून हे काम पूर्ण झाले आहे. विलेपार्ले विभागातील शिक्षकांना हेवा आणि अभिमान वाटावा असे नाव या अभ्यासिकेस देण्यात येणार आहे.विलेपार्ल्यातील किंबहुना मुंबईतील शिक्षण क्षेत्रातील सुप्रसिद्ध, कुशाग्र बुद्धी व अमोघ वक्तृत्वाचे वरदान लाभलेले, शिस्तप्रिय, दूरदर्शी, विज्ञान संन्मुख असे "मुख्याध्यापक नी. र. सहस्त्रबुद्धे" यांचे नाव अभ्यासिकेस देण्यात येत आहे. ही अभ्यासिका संचालित करण्याकरता विलेपार्ले येथील नामांकित सामाजिक संस्था उत्कर्ष मंडळ यांनी दायित्व स्वीकारले आहे व या अभ्यासिकेच्या संचालनाचा, व्यवस्थापनाचा पूर्ण खर्च ते उचलणार आहेत. असे अभिजित सामंत यांनी सांगितले.

# आपल्याला यावेळी राज्यात उलथापालथ करावीच लागणार!



## मनोज जरांगेंचा मेळाव्यातून मोठा इशारा

प्रतिनिधी
बीड

आज दसऱ्यानिमित्त मनोज जरांगे यांचा श्री क्षेत्र नारायणगड, बीड येथे दसरा मेळावा पार पडला. या दसरा मेळाव्यासाठी लाखो मराठा समाजबांधव नारायणगडावर आले होते. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे यांचा हा मेळावा महत्वाचा मानला जात आहे. या मेळाव्यातून मनोज जरांगे यांनी सत्ताधाऱ्यांना मोठा इशारा दिला आहे. "आपल्याला यावेळी उलथापालथ करावीच लागणार", असं मोठं विधान मनोज जरांगे यांनी दसरा मेळाव्यात बोलताना केलं आहे.

"एवढी गर्दी या मेळाव्याला होईल असं वाटलं नव्हतं. या मेळाव्याच्या चारही बाजूला माध्यमांचे कॅमेरे फिरवा, समोरच्यांचा कार्यक्रमच होईल. कधी वाटलं नव्हतं की आपण एवढ्या मोठ्या ताकदीने या ठिकाणी याल. मात्र, आपण या ठिकाणी एवढ्या मोठ्या संख्येने आला आहात. या समुदायावर संस्कार आहेत. हा समुदाय कधीही मस्तीत वागला नाही. प्रत्येकाला सांभाळून घेण्याचं आणि साथ देण्याचं काम या समाजाने केलं. या समाजाने कधीही जातीयवाद केला नाही. एवढं मोठं व्यासपीठ जर पुरत नसेल तर खरोखर तुमच्यासमोर आज मला नतमस्तक व्हावं लागेल. एकदा जर तुम्ही साथ द्यायची ठरवलं तर तुम्ही पूर्णपणे साथ देता. मग तुम्ही हटत नाहीत. एकदा जर तुम्ही नाही म्हणाले तर मग साथ देतच नाहीत. आपण आज काही बोलणार नाही, मर्यादा पाळणार. जरी तुमची इच्छा असली बोलावं, पण मी आपल्या हिंदू धर्माची शिकवण आणि नारायणगडाची शिकवण पाळणार आहे. एकमेकांना समजून घेण्याची शिकवण आपल्याला दिलेली आहे. गडाचा आशीर्वाद ज्यांना ज्यांना मिळतो ते दिल्लीला सुद्धा झुकवतो. याआधी ज्यांना आशीर्वाद मिळाला त्यांनी दिल्लीला झुकवले. पण ते नंतर उलटले", असं मनोज जरांगे यांनी म्हटलं.

"महाराष्ट्रात एक लाट आली आणि उठाव झाला. मात्र, आपल्याला यावेळी उलथापालथ करावीच लागणार आहे. याशिवाय आपल्याकडे पर्याय नाही. आपल्या नाकावर टिचून जर कुठले निर्णय होणार असतील आणि राज्यातील मराठा समाजावर अन्याय होणार असेल तर आपल्याला या समाजाच्या लेकरांसाठी आपल्याला लढावंच लागणार आहे. शेवटी आपल्याला आपला समुदाय आणि शेतकरी महत्वाचा आहे. मला तुमच्याकडून एकच वचन पाहिजे. जर आपल्या राज्यातील जनतेवर अन्याय झाला आणि मी सांगितलं आपल्याल हेच करायचं तर तेच करा, हेच वजन मला आज तुम्ही द्या", असं आवाहन मनोज जरांगे यांनी केलं.

"हिंदू धर्माने आपल्याला अन्यायाविरोधात लढायला शिकवलं आहे. अन्याय होत असेल तर उठाव करायचा हे शिकवलेलं आहे. आपल्या लेकरांना न्याय मिळावा, त्यासाठी हा उठाव सुरु आहे. गोरगरीब मराठ्यांना आरक्षण देण्याची मागणी आम्ही करत आहोत. त्यासाठी आम्ही गेल्या 14 महिन्यांपासून आरक्षणासाठी झुंजत आहोत. मात्र, हे म्हणत आहेत की, तुमच्या आरक्षणाला धक्का लागत आहे. मात्र, आम्ही क्षत्रिय मराठे आहोत, कधीच गप्प बसत नाहीत. माझ्या एखाद्या शब्दामुळे मराठा समाजाला दुष्परिणाम भोगावे लागतील त्यामुळे मी जास्त बोलत नाही", असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

### आचारसंहिता लागेपर्यंत धीर धरा!

"तुमच्या सर्वांच्या मनात जे आहे तेच मी करणार आहे. मी जाता जाता एवढंच सांगतो. आचारसंहिता लागल्यानंतर मी तुम्हाला आपली मुख्य भूमिका सांगणार आहे. मात्र, आचारसंहिता लागेपर्यंत आपल्याला धीर धरायचा आहे. सरकारला सांगतो सुट्टी नाही. पण आचारसंहिता लागल्यावर तुम्ही सर्वांनी माझं ऐकायचं. ते काय करतात हे सगळं आपण पाहायचं. त्यानंतर त्यांनी सगळं करेपर्यंत आपण कोणताही निर्णय घ्यायचा नाही. त्यांनी सगळं केल्यावर आपण निर्णय घ्यायचा. तुमच्या मनात जे आहे, तेच पूर्ण करायची जबाबदारी माझी आहे. तुमची शान मी वाढवल्याशिवाय राहणार नाही", असं मनोज जरांगे यांनी शेवटी म्हटलं आहे.

# जातीयवाद कधी केला नाही आणि यापुढे कधी करणारही नाही!

## पंकजा मुंडेंचा भगवानगडावरुन एल्गार



प्रतिनिधी
बीड

लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांना बीड लोकसभा मतदारसंघात जातीय संघर्षाचा फटका बसला. त्यांचा थोड्या मतांनी पराभव झाला. बीड जिल्ह्यासह टोकदार होत चाललेल्या जातीय संघर्षावर पंकजा मुंडेंनी सावरगावातील भगवान गडावर झालेल्या दसरा मेळाव्यात भाष्य केले. 'हा असा समाज घडवण्यासाठी आम्ही आमच्या आयुष्यातील २२ वर्षे खपवली नाही', असे म्हणत त्यांनी खंत व्यक्त केली.

"पंकजा मुंडे खोटं बोलते का? पंकजा मुंडे थापा मारते का? पंकजा मुंडे अंधारात एक, उजेडात एक वागते का? कुणाला घाबरते का? अंधारात कुणाला जाऊन भेटते का? मी कुणाला घाबरत नाही. घाबरते ते या समोरच्या मैदानात माझं भाषण ऐकायला लोक नसतील, त्या दिवसाला घाबरते. मी भगवान बाबांना प्रार्थना करेन की, असा दिवस सुद्धा उजाडू देऊ नका", असे म्हणत पंकजा मुंडेंनी मनातील भीती बोलून दाखवली.

बीड लोकसभा निवडणुकीच्या निकालाबद्दल पंकजा मुंडे म्हणाल्या, "या बीड जिल्ह्यातील गरीब माणसाचं भलं करण्यासाठी मी काम केलं. एकही गाव सोडलं नाही. गावात मायनस बूथ (कमी मतदान झालेलं) तरी तेवढाच निधी दिला, जितका ९० टक्के मतदान झालेल्या गावाला दिला. कधीच भेदभाव केला नाही. यावेळी गडबड झाली. ते जाऊद्या. आपल्याला ही गडबड पुसून काढायची आहे."

"या राज्यातील प्रत्येक जातीच्या माणसाला विश्वास वाटावा, असं नेतृत्व गोपीनाथ मुंडे होते. छत्रपतींच्या घराण्यांनीही मुंडे साहेबांवर प्रेम केलंय. आज समाजाला काय झालंय? एखाद्या गाडीने एखाद्या लेकराला उडवलं, तर लोक विचारतात की गाडीच्या ड्रायव्हरची जात काय आणि उडवलेल्याची जात काय? एखाद्या नराधमाने एखाद्या लहान चिमुकलीचा जीव घेतला, तिच्यावर अत्याचार केला. तर लोक विचारतात त्या मुलीची जात काय आणि त्या अत्याचार करणाऱ्याची जात काय? हा असा समाज घडवण्यासाठी आम्ही आमच्या आयुष्यातील २२ वर्षे खपवली नाही. आम्हाला असा समाज घडवायचा नाही. आम्हाला अधिकाऱ्याचा सीआर बघून काम द्यायचं आहे. जात बघून काम देणाऱ्याची औलाद गोपीनाथ मुंडेंची नाही. आम्हाला काम करणाऱ्या माणसाच्या पाठिमागे उभं राहायचं आहे. उगीच जातीवर स्वार होणाऱ्या कुणाच्याही पाठीमागे उभं राहायचं नाही", असं म्हणत पंकजा मुंडेंनी विरोधकांवर नामोल्लेख न करता निशाणा साधला.

### भगवानबाबा माफ करतील का?

"मला या देशामध्ये, या राज्यामध्ये कोणीही एखादी फाईल समोर आणली आणि एखाद्या अधिकाऱ्याचं काम असलं की हळूच ते म्हणत की ताई आपला जवळचा आहे. आपला पाहुणा आहे. अरे त्याच्यावर विनयभंगाची केस आहे ना, कसला पाहुणा? असल्या गोष्टी करायला भगवान बाबा माफ करतील का?", असा उलट सवाल त्यांनी समर्थकांना केला.


महाराष्ट्र शासन
म.रा.र.वि.म. (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.), महाराष्ट्र शासनाचा उपक्रम

सायन- पनवेल महामार्गावरील ठाणे खाडी पूल क्र. 3 च्या उत्तर वाहिनीचे लोकार्पण

रेवस ते रेडी (सिंधुदुर्ग) सागरी महामार्गावरील सात खाडी पुलांच्या कामांचे भूमिपूजन दूरदृश्य प्रणालीद्वारे

रविवार, दि. १३ ऑक्टोबर २०२४ रोजी, सकाळी ११.०० वा । स्थळ : ठाणे खाडी पूल, मानखुर्द बाजू

शुभहस्ते
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

मुख्य अतिथी
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री

प्रमुख अतिथी
दादाजी भुसे
मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)

विनित
डॉ. अनिलकुमार गायकवाड
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.)

श्रीमती. मनिषा पाटणकर - म्हैसकर, भा.प्र.से
अपर मुख्य सचिव
सार्वजनिक बांधकाम विभाग



देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

दादाजी भुसे
मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)

**सायन पनवेल महामार्गावरील ठाणे खाडी पुल क्र. 3**
- प्रकल्पामधील कामाचा वाव : प्रत्येकी ३ मार्गिकेचे २ पूल बांधणे (मुंबईहुन पुण्याकडे जाणारी उत्तर वाहिनी काम पूर्ण व पुण्याहून मुंबईकडे जाणारी दक्षिण वाहिनी काम प्रगतीपथावर)
- प्रकल्पाची एकूण किंमत : रु. ५५९ कोटी.
- पुलाची लांबी : ३१८० मी.
- सद्यास्थितीत उत्तर वाहिनी पुलाचे काम पूर्ण करुन ती वाहतूकीस खुली करण्यात येत आहे.

**रेवस ते रेडी (सिंधुदुर्ग) या सागरी महामार्गावरील ७ पुलांच्या कामाचे भूमिपूजन (दूरदृश्य प्रणाली द्वारे)**
- रेवस ते रेडी (सिंधुदुर्ग) सागरी महामार्गाची एकूण लांबी : ४९८ किमी.
- पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा महामार्ग, कोकण किनारपट्टी वरील सर्व सागरी किनारे यांना गतिमान महामार्गाने जोडणारा प्रकल्प.
- सागरी महामार्गावरील खालील नमुद ७ पुलांचे भूमिपूजन आज होत आहे.
- सर्व ७ पुलांची एकूण लांबी २६.७० किमी आणि एकूण प्रशासकीय मान्यता रु. ७८५१ कोटी इतकी आहे.

**रेवस- कांरजा भागातील धरमतर खाडीवरील पुल :**
- एकूण लांबी : १०.२० किमी.
- प्रशासकीय मान्यता : रु. ३०५७ कोटी
- पुलाचा प्रकार : स्टिल ब्रिज (लोखंडी पुल)
- कामाची मुदत : ३ वर्ष – २०२७ मध्ये पूर्ण होईल.

**रेवदांडा- साळाव भागातील कुंडलिका खाडीवरील पुल :**
- एकूण लांबी : ३.८२ किमी.
- प्रशासकीय मान्यता रक्कम : १७३६ कोटी
- पुलाचा प्रकार : केबल स्टे
- कामाची मुदत : ३ वर्ष

**दिघी आगरदांडा भागातील आगरदांडा खाडीवरील पुल :**
- एकूण लांबी : ४.३१ किमी.
- प्रशासकीय मान्यता रक्कम : १३१५ कोटी.
- पुलाचा प्रकार : केबल स्टे
- कामाची मुदत : ३ वर्ष

**बागमांडला वेश्वी भागातील बाणकोट खाडीवरील पुल :**
- एकूण लांबी : १.७११ किमी.
- प्रशासकीय मान्यता रक्कम : रु. ४०८ कोटी
- पुलाचा प्रकार : केबल स्टे
- कामाची मुदत : ३ वर्ष

**केळशी भागातील केळशी खाडीवरील पुल :**
- एकूण लांबी : ६७० मी.
- प्रशासकीय मान्यता रक्कम : रु. १४८ कोटी
- पुलाचा प्रकार: बॉक्स गर्डर
- कामाची मुदत : ३ वर्ष

**जयगड खाडीवरील पुल :**
- एकूण लांबी : ४.४० किमी.
- प्रशासकीय मान्यता रक्कम : रु. ९३० कोटी
- पुलाचा प्रकार : केबल स्टे
- कामाची मुदत : ३ वर्ष

**कुणकेश्वर येथील पुलाचे बांधकाम**
- एकूण लांबी : १५८० मी.
- प्रशासकीय मान्यता रक्कम : रु. २५७ कोटी
- पुलाचा प्रकार : केबल स्टे

डी.जी.आय.पी.आर/आरओसी/२०२४-२५/क्र.५/सी ४४७७